

मासिक वार्तापत्र • अंक 35 • नोव्हेंबर 2023 • सहयोग मूल्य : रु. 10 • 12 पाने

# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक


पुण्यात कामाच्या जागी बांधकाम कामगारांचे मृत्यू 3

6 महिन्यांच्या वांशिक संघर्षानंतर दुभंगलेल मणिपूर 5

थॉमस संकारा : आफ्रिकन क्रांतिकारी 11


## मराठा-ओबीसी आरक्षण संघर्ष : बेरोजगारीच्या प्रश्नावर पांघरूण घालण्याचे राजकारण

## अस्मितावादाला दूर सारा, रोजगार अधिकाराचा संघर्ष उभा करा !

संपूर्ण महाराष्ट्रात मराठा विरुद्ध ओबीसी संघर्ष पेटवण्याचे राजकारण जोमाने सुरू असताना आज राज्यातील व देशातील सर्वजातीय युवकांनी, कामगार-कष्टकऱ्यांनी गांभीर्याने लक्षात घेण्याची गरज आहे की या आंदोलनांच्या मागण्या अर्थहीन आहेत, भरकटवणाऱ्या आहेत. कोणत्याही नवीन आरक्षणाच्या मागणीने आज विशेष काहीही साध्य होणार नाही. वास्तवात, या दोन्ही आंदोलनांच्या माध्यमातून समाजात पसरत असलेल्या बेरोजगारी विरोधातील असंतोषाला भरकटवण्याचे काम आज सर्व प्रमुख भांडवली पक्षांची नेतेमंडळी एकत्र येऊन करत आहेत.

मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वातील मराठा आरक्षण आंदोलनाच्या दुसऱ्या उपोषणाची नुकतीच सांगता झाली. फडणवीस, शिंदे व शरद पवारांसहित सर्वपक्षीय नेतृत्वाने दिलेल्या आश्वासनाच्या आधारावर 24 डिसेंबरपर्यंत पुन्हा मुदतवाढ देऊन हे उपोषण संपले आहे. मधल्या काळात दबाव टिकवण्यासाठी साखळी उपोषणे, सभा यांचे सत्र मात्र चालूच राहणार आहे. मराठ्यांना सरसकट कुणबी म्हणून ओबीसी आरक्षणात समावेश करावा या मागणीच्या विरोधात 17 नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादी (अजित पवार गटा) चे सत्तेत मंत्रीपद उपभोगणारे छगन भुजबळ, भाजपचे वाचाळवीर गोपीचंद पडळकर, काँग्रेसचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार अशी विविध पक्षीय ओबीसी नेत्यांची आरक्षण बचाव महाएल्गार सभा जालन्यात पार पडली आहे. दोन्ही बाजूंनी शड्डू ठोकून एकमेकांना आव्हाने दिली जात आहेत. टीकेचा स्तर आता वैयक्तिक झाला असून "सासऱ्याच्या घरी तुकडे मोडत नाही" इथपर्यंत वैयक्तिक टीका केली जात आहे, तर दुसरीकडे मराठा असल्याचा गर्व दाखवत "आम्हाला आरक्षण फक्त शिक्षणासाठी पाहिजे, नाहीतर आमची बरोबरी करायला तुमच्या सात पिढ्या पुरणार नाहीत"

**संपादक मंडळ**

असे म्हणत तथाकथित खालच्या जातींना हिणवणारे अनेक व्हिडिओ इंस्टाग्राम व इतर सोशल मीडियावर पसरत आहेत. सर्व प्रमुख पक्षांचे नेते येऊन दोन्ही बाजूंनी भुमिका घेण्यामागे बेरोजगारीच्या प्रश्नाला जातीच्या चौकटीत अडकवण्याचे राजकारण काम करत आहे. मराठा-कुणबी वा मराठा-ओबीसी या दोन्ही वादांच्या मुळाशी असलेल्या वर्गीय अंतर्विरोधांना जातीय चौकटीत अडकवण्याचे हे राजकारण आहे.

### मराठा-कुणबी वाद : वर्गीय अंतर्विरोधांची जातीय अभिव्यक्ती

देशात भांडवली उत्पादन पद्धत निर्माण व कायम होण्याच्या प्रक्रियेत, बदलत्या उत्पादन संबंधांसोबत जातिव्यवस्थेच्या बदललेल्या रूपाचीच अभिव्यक्ती आहे आज समोर आलेला मराठा-कुणबी वाद. महाराष्ट्रात सामंती पद्धतीने शेती उत्पादनात गुंतलेल्या शेतकरी समूहाचाच एक भाग सामंती सैन्य व्यवस्थेचा सुद्धा भाग होता. व्यक्तीची जात बदलत नसली, तरी एखाद्या जातीचे जातीय-उतरंडीतील स्थान मात्र बदलण्याची गतिकी जातिव्यवस्थेत नेहमीच अस्तित्वात होती, आणि याचाच परिणाम म्हणून सैनिकी कौशल्याच्या जोरावर मराठ्यांचा क्षत्रियत्त्वाचा दावा बनला. मराठा शब्दाला जातीवाचक समजावे की प्रदेश वाचक वा व्यवसाय वाचक याबाबत सुद्धा इतिहासकारांमध्ये विविध मते असली, तरी कुणबी म्हणजे शेती करणारे याबाबत मात्र एकवाक्यता सापडते. म्हणूनच कुणबी इतर जातींमध्येही सापडतात. व्यवसायगत विभाजन दिसत असले तरी कुणबी आणि मराठ्यांमध्ये रोटी-बेटी व्यवहारांच्या स्तरावर ठोस विभाजन नव्हते. 96 कुळी नावाने स्वत:ला अधिक उच्चभ्रू समजणारे आणि ऐतिहासिकरित्या तुलनेने मोठे जमीनमालक असणारे मराठे नेहमीच स्वत:ला एक वरची पोटजात समजत आले.

परंतु विशेषत: स्वातंत्र्यानंतर, शेतीमध्ये भांडवली उत्पादन संबंधांची वाढ झाल्यानंतर, आणि देशातील शेतीचे भांडवली शेतीमध्ये रुपांतर झाल्यानंतर (म्हणजे अशी शेती जी

पान 4 वर

## महिला आरक्षणावर कामगारवर्गीय दृष्टिकोन काय असावा?

✎ प्रियंवदा

मोदी सरकारच्या इतर सर्व जुमल्यांप्रमाणे महिला आरक्षणाच्या जुमल्याचे सत्य सुद्धा, आरक्षणाचे विधेयक येताच अनावृत झाले. या विधेयकाचे समर्थन करणाऱ्या बुर्झ्वा राजकीय पक्षांच्या बुर्झ्वा महिला नेत्या आणि खात्या-पित्या मध्यमवर्गातून येणाऱ्या महिलांसाठी सुद्धा हे विधेयक एक फुसका फटाकाच सिद्ध झाले. मोठ्या गाजावाजात संसदेच्या विशेष सत्रात हे विधेयक आणले गेले आणि जोरदार धूरळा उडवला गेला. परंतु हा धूरळा बाजूला होताच समोर आले की पुढील जनगणनेपर्यंत आणि मतदारसंघ फेररचना होईपर्यंत हा कायदा लागू होणारच नाही. **प्रश्न आहे की जर हे आरक्षण लगेच लागू होणार नव्हते तर सरकारने संसदेचे विशेष सत्र बोलावून इतक्या तातडीने हा प्रस्ताव का समोर आणला? या प्रश्नाचे उत्तर तर आपण पाहूच, परंतु त्या अगोदर नवीन जनगणना आणि मतदारसंघ फेररचनेचे काम कधीपर्यंत होणार हे अगोदर जाणून घेऊ, ज्याचे उत्तर निश्चितपणे तुम्हाला हैराण करेल. तुम्हाला आणि आम्हाला तर फक्त आश्चर्य वाटेल, परंतु बुर्झ्वा महिला, सर्व फेमिनिस्ट (स्त्रीवादी) आणि अस्मितावाद्यांसाठी हे विधेयक म्हणजे असा लाडू निघाला जो हातात तर आला, पण तोंडी नाही लागला!**

भारतात शेवटची जनगणना 2011 मध्ये झाली. दर दहा वर्षांनी जनगणना होते, परंतु 2021 मध्ये जनगणना झाली नाही. पुढील जनगणना कधी होईल, हे सुद्धा निश्चित नाही. परंतु जर 2031 मध्ये जनगणना झाली तर त्या आधारावर मतदारसंघांची फेररचना आणि विस्तार केला जाईल. भांडवली राजकीय विश्लेषकांचे मत आहे की या आरक्षणाला वास्तवात उतरवण्यास एक दशकापेक्षा जास्त काळ लागेल. त्यांच्या मते घटनेच्या कलम 82 (2001 मध्ये सुधारित) नुसार, 2026 मध्ये जनगणनेचे सुरुवातीचे आकडे येण्याअगोदर फेररचना शक्य नाही. ही जनगणना 2021 मध्येच होऊ शकेल. फेररचना आयोगाला त्यांचा अहवाल देण्यासाठी किमान 3 ते 4 वर्षांचा वेळ लागतो आणि मागील आयोगाने तर 5 वर्षांनंतर अहवाल दिला होता. दुसरे हे की लोकसंख्येच्या दरात झालेले बदल पाहता पुढील फेररचना विवादास्पद होऊ शकते. याचीच शक्यता खूप आहे की 2037 पर्यंत फेररचनेचा अहवाल येईल आणि 2039 पर्यंत तिला लागू केले जाऊ शकेल.

**म्हणजे हे तर स्पष्ट आहे की या विधेयकाला मोदी सरकार इतक्या घाईघाईने यासाठी घेऊन आले नाही की त्यांना महिलांच्या हितांची चिंता आहे. त्यांना फक्त याच्या नावाने अजून मतं पाहिजेत. यासोबतच जे लोक मोदी सरकारच्या या पावलावरून स्तुतीचे फुगे फुगवत आहेत, त्यांची हवा जायला वेळ लागला नाही, आणि आता या विधेयकाच्या सरकारी व गैर-सरकारी समर्थक भाटांची बोलती बंद झाली आहे. कारण सर्वांना समजले आहे की हे असे विधेयक आहे जे लागू होणारच नाहीये.**

2014 मध्ये 'महिला सशक्तीकरण' आणि 'बेटी बचाओ-बेटी पढाओ'च्या नाऱ्यांसह आलेल्या या सरकारच्या 9 वर्षांच्या कार्यकाळात महिलांची स्थिती आगीतून निघून फुफाट्यात पडल्यासारखी झाली आहे. हे आता

पान 6 वर

# 6 महिन्यांच्या वांशिक संघर्षानंतर दुभंगलेल मणिपूर: भाजपच्या जातीयवादी राजकारणाची परिणती

पान 5 वरून

देऊ नये आणि असे केल्यास होणाऱ्या परिणामांना मेईतेई लिपून जबाबदार राहणार नाही. त्यांनी हेच धोरण मणिपुर मधील ए.एस.पी. थोनजाम ब्रिंदा यांच्याविरोधात सुद्धा अवलंबले होते, ज्यांनी दावा केला होता की मेईतेई लिपून व अरंबाई तेंगोल हे राज्यातील हिंसाचाराला सर्वाधिक जबाबदार आहेत. मेईतेई लिपुनच्या गुंडांनी त्यांच्या घरावर 4 ऑक्टोबर रोजी हल्ला केला आणि त्यांना माफी मागणारा व्हिडिओ बनवण्यास भाग पाडले.

हे लक्षात घेतले पाहिजे की वृंदा त्याच ए.एस.पी. आहेत ज्यांनी मणिपूर उच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात बीरेन सिंहचा राज्यातील अंमली पदार्थांच्या व्यापाराला असलेल्या आश्रयाचा दाखला दिला होता. जून 2018 मध्ये, 150 कर्मचाऱ्यांसह, थोनजाम यांनी भाजपचे सदस्य असलेले माजी स्वायत्त जिल्हा परिषदेचे (ADC) अध्यक्ष चंदेल लुखोसेई झू यांच्या कार्यालयावर छापा टाकला होता आणि छाप्याचा एक भाग म्हणून कोट्यवधींचे ड्रग्ज सापडले होते. तेव्हा सीएम बिरेन सिंग यांनी, प्रत्युत्तर म्हणून, त्यांच्या दुसऱ्या पत्नीचा "उजवा हात" असलेल्या चंदेल यांच्यावरील आरोप रद्द करवण्यासाठी आकाश पाताळ एक केले, आणि डीजीपी व नंतर, थोनजामचे थेट वरिष्ठ असलेले एसपी यांच्याशी बोलून तिच्यावर आरोप मागे घेण्यासाठी दबाव आणला होता. कथितपणे, त्याने तिला स्वत:च "रागेही" भरले होती. असा हा बिरेन सिंह नावाचा माणूस राज्यातील "नार्को-दहशतवादा" विरुद्धच्या कारवाईचे नेतृत्व करत आहे, ही थट्टाच आहे.

या गेल्या पाच महिन्यांत, मणिपूरचे दोन भाग झाले आहेत, सांप्रदायिक फॅसिस्ट राजकारणाच्या वेदीवर (अधिकृतपणे) 200 हून अधिक प्राणांची आहुती देण्यात आली आहे आणि जवळपास 70,000 लोक विस्थापित झाले आहेत. अशी प्रत्येक विभागणी फॅसिस्ट भाजपला आपली मुळे आणखी खोलवर पसरवण्यासाठी सुपीक जमीन तयार करण्यास मदत करते. कोणत्याही संकुचित अस्मितेवर आधारित राजकारण याच परिणतीकडे येते. देशातील दडपल्या गेलेल्या जनसमुदायांसाठी खरा तोडगा आहे अत्याचारी भारतीय राज्यसत्तेशी लढणे, एकमेकांशी नाही. आपण हे समजून घेतले पाहिजे की हे जनमत चाचणीद्वारे नाही तर केवळ डावपेच आणि दबावाच्या रणनीतीद्वारे मणिपूर भारतात आले आणि तेव्हापासून, तेथील प्रत्येक न्याय्य संघर्ष लष्करी दडपशाहीद्वारे किंवा जात-जमातीच्या राजकारणाद्वारे, बेरोजगारीपासून टोमॅटोच्या भाववाढीपर्यंतच्या सर्व समस्यांसाठी अल्पसंख्याकांना जबाबदार धरून अल्पसंख्याकांच्या विरोधात बहुसंख्यांकांना भडकावून दडपला आहे. मणिपूरच्या लोकांनी पाशवी सशस्त्र दल विशेष अधिकार कायदा (ASFPA) आणि दडपशाही विरुद्ध दीर्घकाळ लढा दिला आहे.

संपूर्ण अशांतता आणि जातीय कलहात आज दोन भागात विभागलेल्या मणिपूरमधील संकटाचे मूळ कारण म्हणजे सत्ताधारी भाजपचे विभाजनाचे आणि द्वेषाचे राजकारण, कायद्याच्या उघड उल्लंघनाविरुद्ध संपूर्ण निष्क्रियता, मेईतेई समुदायाच्या सांप्रदायिक गटांद्वारे केलेल्या हिंसाचारात सरकारचा सहभाग, म्हणजेच 'फूट पाडा आणि राज्य करा'चे राजकारण. मुख्यमंत्री बिरेन सिंह यांचे संरक्षण करून, पंतप्रधान आणि सत्ताधारी भाजपने देशभरात संदेश दिला आहे की त्यांच्या शासनाला असलेल्या कोणत्याही विरोधाला पूर्णपणे चिरडण्यात ते अजिबात हयगय करणार नाहीत.

### 'कामगार बिगुल'चे सर्व वाचक आणि हितचिंतक यांना आवाहन

'कामगार बिगुल'च्या सर्व वाचकांना आणि हितचिंतकांना आमचे आवाहन आहे की जर आपण या प्रकाशनाचे महत्त्व समजत असाल आणि जनतेचे प्रसारमाध्यम उभे करण्याच्या आमच्या प्रयत्नांचा एक आवश्यक भाग मानत असाल, तर खालील मार्गांनी 'कामगार बिगुल' सुरू ठेवण्यात आम्हाला साथ द्या:

1. कामगार बिगुलची वार्षिक, पंचवार्षिक वा आजीवन सदस्यता घ्या.
2. जर तुमची सदस्यता संपली असेल, तर तिचे नुतनीकरण करा.
3. 'कामगार बिगुल' चे वितरक बना. याला जास्तीत जास्त संख्येने कामगार-कष्टकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात तुमची भुमिका बनवा.
4. 'कामगार बिगुल' करिता नियमित आर्थिक सहयोग द्या.

आम्ही जनतेच्या शक्तीवर विश्वास ठेवतो आणि आमच्या अनुभवाने सिद्ध केले आहे की कोणतीही तडजोड न करता, एका विचाराने जोडलेल्या लोकांची एकत्र मेहनत, आणि सहयोगाच्या जिवावर मोठी कामं होऊ शकतात. याच शक्तीच्या आधारावर गेली अनेक वर्षे कामगार बिगुल प्रकाशित होत आहे. तुम्ही साथ द्याल, याचा विश्वास नक्कीच आहे.

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.


• रुम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727

• अहमदनगर : 74992 64646

• पुणे : 8669735643


### 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांत्यांचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अशा चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य राजकीय कार्यदिशेची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य कार्यदिशेच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्यांच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतिकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**

### बिगुल व्हॉट्सअॅप चॅनेल

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअॅप चॅनेल जॉईन करावा :**

**http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा :**

**9892808704**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**


## कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय : | | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | kamgarbigul@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 10 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 120 (टपाल शुल्काशिवाय) |

# पुण्यात कामाच्या जागी बांधकाम कामगारांचे मृत्यू

## मालक-ठेकेदार युतीच्या नफेखोरीचे बळी!

✎ परमेश्वर जाधव

पुण्यात नुकत्याच झालेल्या दोन घटनांमध्ये तीन बांधकाम कामगारांचा कामाच्या ठिकाणी मृत्यू झाला आहे. घटना घडून तीन महिने झाले असतानासुद्धा, आतापर्यंत सरकारने मृत्युमुखी कामगारांच्या नातेवाईकांना नुकसानभरपाई देणे तर सोडा, या अपघातात दोषी असलेल्या बिल्डर आणि ठेकेदारांना मोकळे सोडले आहे! सन 2019 च्या एका आकडेवारी नुसार भारतात दररोज 38 बांधकाम कामगारांचा कामाच्या ठिकाणी मृत्यू होतो. अशा घटना जेव्हा घडतात तेव्हा सरकारी अधिकारी याचा दोष कामगार कामाप्रती सजग नसणे, कामगाराकडे कौशल्य नसणे, वेळेचा अचूक अंदाज कामगारांना घेता न येणे किंवा व्यवस्थापकीय हलगर्जीपणा अशी कारणे देऊन घटनेला "नैसर्गिक घटना" म्हणून अहवालात निष्कर्ष काढतात. आपली जबाबदारी कामगारांवर ढकलून मोकळे होणारे मालक आणि त्याच्या वर्गीय हितसंबंधांचे संवर्धन करणारी राज्यसत्ता हे गणित नेहमीच दिसून येते. पुण्यातील घटनांमध्ये सुद्धा असे उघडपणे दिसून आले आहे.

राजगुरूनगर येथे एका घराचे बांधकाम चालू होते. त्या घराचे बांधकाम करण्यासाठी एकूण चार कामगार काम करत होते. घराचे काम करत असताना पूर्वीचे जुने घर पाडून नवे घर बांधणे अशा प्रकारचे नियोजन घर मालक आणि ठेकेदारांनी केले होते व तसा अलिखित करार ठेकेदाराशी केलेला होता. या अलिखित कराराच्या आधारे ठेकेदारांनी घराचे काम मालकाकडून एकरकमी पैसे ठरवून घेतले होते. चार बांधकाम कामगार, दोन मिस्त्री कामगार आणि दोन बिगारी कामगार असे, मिळून घराचे बांधकाम करत होते. दोन बिगारी कामगारांमध्ये एका महिला कामगाराचा समावेश होता. जुने घर पाडताना घरचा वरचा मजला कामगारांच्या अंगावर पडला आणि त्याठिकाणी दोन कामगारांचा मृत्यू झाला. अशीच एक दुसरी घटना म्हणजे वारजे माळवाडी येथे घडली. या ठिकाणी एका इमारतीचे बांधकाम चालू होते. दुसऱ्या मजल्याचे बांधकाम चालू असताना एक कामगार खाली तळमजल्यावर पडला. त्यानंतर त्यांना खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले पण मार खूप जबर लागला होता. त्यामुळे त्या कामगाराचा हॉस्पिटलमध्ये मृत्यू झाला.

### नियमबाह्य कामे आणि कामाचे अनौपचारिकीकरण : मालक-बिल्डर युतीचा फायदा

दोन्ही घटनामध्ये अलिखित करार झाल्याचे दिसून येते. अशा कामांमध्ये निवासी, व्यावसायिक इमारतीचे काम, रस्ते, दळणवळण इत्यादींचे बांधकाम करताना प्रामुख्याने जमिनीचा मालक, बिल्डर, मुख्य ठेकेदार, लहान ठेकेदार आणि कामगार अशी संरचना काम करते. जागांची मालकी आणि बांधकामाचा आकार, खर्च या आधारे यात बदल होतात. राजगुरूनगर मध्ये ठेकेदारांची पूर्ण जबाबदारी होती की त्याने जुने घर पाडून नवीन घर बांधून द्यावे. वारजे माळवाडी या ठिकाणी असाच अलिखित करार मालक आणि ठेकेदार याच्यात झालेला होता. ठेकेदारांने नाक्यावरील कामगारांना रोजंदारी मजुरीच्या आधारे कामगारांना काम लावले होते. ठेकेदारांनी मालकाकडून घेललेले काम प्रति स्क्वेअर फूट आधारे घेतले होते. त्यामध्ये बांधकामासाठी लागणारे कच्चा माल आणि इतर साहित्याचासुद्धा समावेश होता.

मालकांचा खर्च कमी करण्यासाठी मालकाने जी सूत्र लावली होती, ती होती: कामगारांची मजुरी हा दुय्यम किंवा गौण मुद्दा ठेवून ठेकेदाराशी करार, कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेला दुय्यम लेखणे, वेगाने काम करण्याचा आग्रह, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या परवानग्यांना बगल देणे. ठेकेदाराने सुद्धा या सर्व गोष्टींची जाणीव असताना कामगारांना कामास लावले होते. ठेकेदाराने सुद्धा स्वतःचा नफा आणि मालकाचे हित ध्यानात ठेवून कामाच्या ठिकाणची नीट पाहणी केली नाही; कामाच्या ठिकाणी कामगारांना सुरक्षित किट दिले नाही; कामगारांची नोदणी केली नाही, आणि कमी मजुरीत जास्तीत जास्त काम हेच सूत्र ठेवून कामगारासोबत व्यवहार केला. कामाचे तास देखील निश्चित नव्हते. पुण्यातील कामगारांनी तर राजगुरुनगर या ठिकाणी जाऊन काम केले. प्रवासाच्या वेळेला देखील कामाच्या वेळेत गृहीत धरलेले नव्हते. त्यामुळे कामगारांना सकाळी सहा वाजता शिवाजीनगर बस स्थानकाला पोहचणे आणि रात्री दहा अकरा वाजता परत घरी पोहचणे भाग होते. मालक-ठेकेदारांच्या अशा नफेखोरीपायी असुरक्षित परिस्थितीची निर्मिती केल्यामुळेच अपघात झालेले आहेत.

शासकीय नियमानुसार अशा प्रकारचा बांधकाम करण्याचा आराखडा आणि त्याचा तपशील स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच ग्राम पंचायत, नगरपालिका किंवा महानगरपालिका यांना देणे बंधनकारक आहे. पण या दोन्ही प्रकरणात असे झालेले नव्हते. घराचे बांधकाम करताना जागेची किंमत सोडून एकूण बांधकामाच्या खर्चापैकी एक टक्का रक्कम बांधकाम मंडळाकडे जमा करणे आवश्यक असते. पण अशी संबंधित बांधकामाची नोंदणी झालेली नव्हती. दुसरे म्हणजे जे कामगार काम करतात त्यांची नोंदणी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मदतीने करणे इमारत आणि इतर बांधकाम कामगार मंडळांना करणे आवश्यक आहे. तसे सुद्धा झाले नाही. तिसरे म्हणजे कामाच्या ठिकाणी देखरेख ठेवण्यासाठी कामगार अधिकारी याची जबाबदारी असते. कामगार अधिकारी कामाच्या ठिकाणी कामाच्या जागेच्या सुरक्षिततेबाबत, मजुरी आणि पाणी, स्वच्छता यावर निगराणी ठेवण्याचे काम करतात पण तसेही काहीही झाले नाही. या युतीची किंमत बांधकाम कामगारांना मोजावी लागत आहे.

### पोलिसांचा दुजाभाव

तीन कामगारांचा मृत्यू झाल्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये प्रथम माहिती अहवाल (FIR ) नोंदवला गेला . पोलिसांनी अपघाताच्या माहितीत कारण अपघाती असे म्हणत औपचारिकता पूर्ण केली आहे. जागामालक, ठेकेदार यांचा जबाब घेतला गेला नाही. त्यासाठी अपघात आणि त्यात सहभागी व्यक्ती याची उलटतपासणी केली गेली नाही. हा अपघात एका सामान्य परिस्थितीत घडला आहे अशा प्रकारे नोंद केली आहे. थोडक्यात गुन्ह्याची तीव्रता कमी करण्यात पोलिसांनी कोणताही कसूर सोडला नाही. कामाच्या ठिकाणी जेव्हा अपघात होतो तेव्हा अपघातात निधन झालेल्या नातेसंबंधातील व्यक्तींना प्रथम माहिती अहवाल आणि त्यामधील तरतूद कायदे आणि त्याचे कलमाची माहिती देणे आवश्यक असते. तसे सुद्धा केले जात नाही आणि ह्या प्रकरणात सुद्धा केले गेले नाही. या घटनेत पोलिसांची भूमिका घरमालक आणि ठेकेदार यांच्या भूमिकेला पूरक ठरली आहे .

### मोडकळीस आणलेले कामगार कायदे आणि कामगार कल्याण कार्यालये

कामगार आयुक्त कार्यालय कामगारांच्या विविध प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी आहे, असा दावा सरकार आणि अधिकारी करतात. कामगार कायदे जे केंद्र आणि राज्य सरकारद्वारे निर्माण केले जातात, त्या कायद्यांची अंमलबजावणी जिल्हा कामगार कार्यालयातून केली जाणे अपेक्षित आहे. परंतु वास्तव काय आहे? बांधकाम चालू असलेल्या ठिकाणी कामगारांना काम सुरक्षित करता यावे म्हणून सुरक्षित साधने उपलब्ध करून देणे, कामाच्या जागेची पाहणी करणे, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह आणि विश्रामगृह आहेत का याची पाहणी करणे, बांधकाम कामगार नोंदणी करणे अशा विविध जबाबदाऱ्यांपैकी कोणतीही जबाबदारी पार पाडली गेली नाही. ज्या नुकसानभरपाईची महाराष्ट्र सरकार रोज जाहिरात करते, त्या नुकसानभरपाईसाठी कामगारांची नोंदणी नाही त्यामुळे ते पात्र नाहीत असा निष्कर्ष काढून स्वतःची जबाबदारी काढून टाकली गेली आहे. बांधकाम मंडळाकडून नियमित नोंदणी झाली पाहिजे. हा आग्रह नियमित स्वरूपात विविध कामगार युनियनकडून केला जात आहे. परंतु नोंदणीची प्रकिया खूप किचकट आणि कामगार विरोधी आहे, त्यामुळे नोंदणीला अडचणी येतात, आणि ही परिस्थिती बदलण्यासाठी ना कामगार कार्यालयांना इच्छा आहे, ना त्यांना चालवणाऱ्या सरकारांना.

सरकारने जाणीवपूर्वक कामगार आयुक्त कार्यालयाला मोडकळीस आणले आहे. महाराष्ट्रात कामगार कार्यालयातील अधिकारी यांचे भरतीचे प्रमाण खूप कमी केले गेले आहे. कामगार अधिकारी निवृत्त होतात, त्याच्या जागी नवीन भरती करणे बंद केले गेले आहे. इतकेच नाही नवीन कामगार अधिकारी भरतीचे काम कमी केले गेले आहे. जी भरती केली जाते ती सुद्धा आता कंत्राटी पद्धतीने केली जात आहे. त्यामुळे कामगारांच्या कामाच्या ठिकाणची सुरक्षितता आता मालक आणि ठेकेदार याच्या भरवशावर सोडली आहे.

केंद्रात मोदी सरकार सत्तेत आल्यापासून सुरक्षाविषयक कामगार कायद्यात सुद्धा बदल केला आहे. आता कामाच्या ठिकाणी सुरक्षितता आता मालक वर्गावर सोपवली गेली आहे. कामगार अधिकारी विशेषतः जिल्हा कामगार अधिकारी कार्यालय यांची कामाच्या ठिकाणी सुरक्षितता आणि इतर महत्त्वाच्या जबाबदारी त्याच्यातून मुक्तता केली आहे.



### न्याय कधी मिळणार?

कामगारांचा कामाच्या ठिकाणी मृत्यू हा विषय सध्या कामगार कोर्टात प्रलंबित आहे . कामगारांच्या नातेवाइकांकडे वकील करण्यासाठी पैसे नाहीत. दोन महिन्यापेक्षा अधिकच कालावधी गेला आहे. पण कोर्टाने अजून तरी या प्रकरणात निकाल लावला नाही. कामगारांच्या नातेवाइकांनी आता आपल्या बाजूने निकाल लागेल ही आशा सोडली आहे. ज्या कामगारांचा मृत्यू झाला आहे, त्या सर्व कामगारांची आर्थिक परिस्थितीच मजुरीवर म्हणजे हातावर पोट अशी आहे. अपघाती मृत्यू झालेल्या एका कामगारांची पत्नी गर्भवती होती. तिची आता प्रसूती झाली आहे. त्यांना आपल्या नवऱ्याचा मृत्यू झाला आहे या दुःखासोबत आपल्या घरातील काम करणारा कमवता व्यक्ती गेला आहे, त्याचेही दुःख आहे. त्यांनी आपल्या प्रसूतीसाठी जवळ असलेले सोने नाणे सर्व विकले आहे. नातेवाईकांकडून उधार पैसे घेऊन खर्च भागवला आहे. बाळ एक महिन्याचे असताना शेतात मजुरी करून आपले घर चालवत आहे. कामगारांच्या घरातील इतर दोन सदस्य नाक्यावर येऊन तर कधी घरकाम करून आपली उपजीविका करत आहेत.

मागील तीन महिन्यापासून कामाच्या ठिकाणी मृत्यू पावलेल्या तीन कामगारांच्या नातेवाईकांनी सरकारकडून न्यायाची अपेक्षा केव्हाच सोडली आहे. त्याच्या आतापर्यंतच्या श्रमकालावधीत सरकारकडून कोणतीही मदत मिळाली नाही. उलट त्याच्या कष्टातून निर्माण केलेले धरणे, रस्ते, घरे, मॉल, भव्य दिव्य इमारतीतून बिल्डर, जमीन मालक आणि ठेकेदाराच्याच संपत्तीत वाढ झाली आहे. त्यामागे खरे कारण म्हणजे अस्तित्वात असलेली भांडवली व्यवस्था जिचा मुळे उद्देश नफा मिळवणे हाच आहे. त्यासाठी ती कामगार वर्गांना कमी वेतन देणे, कामाचे तास जास्त करणे, कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण आणि साधने न देणे, ओव्हरटाईम किंवा इतर सामाजिक आणि आरोग्य सुविधा न देता फक्त कामासाठी जिवंत ठेवणे आणि अपघातात मरणासाठी सोडणे हेच एकमेव उद्दिष्ट आहे. मोदी सरकार सत्ताधीन झाल्यानंतर कामगारांच्या शोषणात सर्वाधिक वाढ झाली आहे. कामाचे तास वाढवले, मजुरी कमी केली, सामाजिक सुरक्षितता असलेले मर्यादित कायदे ते सर्व नाहीसे केले. त्यामुळे कामगार आणि कष्टकरी वर्गाचे जीवन नरकासमान झाले आहे.

सतत होणाऱ्या आणि वाढत्या कामगार अपघातांना अशाप्रकारे मोदी सरकारची धोरणे, नफेखोर व्यवस्था, बिल्डर-ठेकेदार-मालक यांची युती कारणीभूत आहे. संघटित होऊन तीव्र लढा उभारल्याशिवाय यापैकी कोणाकडूनही न्यायाची अपेक्षा करणे व्यर्थ आहे.

# मराठा-ओबीसी आरक्षण संघर्ष

पान 1 वरून

बाजारासाठी केली जाते, मजुरी देऊन जिथे मजुरांना कामाला लावले जाते, जिथे वाट्याने शेती होत असल्यास वाटा बाजाराच्या सरासरी नफ्याच्या दराने निर्धारित होतो, जिचे उद्दिष्ट नफा आहे अशी शेती) मात्र मराठा-कुणबी ही तफावत आता धनिक शेतकरी विरुध्द गरिब शेतकरी व शेतमजूर या स्वरूपात वाढणे अपरिहार्य होते. कुणबींचा ओबीसींमध्ये झालेला समावेश ही सुद्धा त्याचीच पावती होती. महाराष्ट्रातील धनिक भांडवली शेतकरी वर्गाचा मोठा हिस्सा आज 96 कुळी मराठ्यांमधील उच्च वर्गाचा आहे, सहकारी संस्था, साखर कारखाने, शिक्षण संस्था, विविध पक्षांचे राजकीय नेतृत्व याच गटातून येते. परंतु शेतीच्या विभाजनामुळे व बाजाराच्या स्पर्धेत टिकाव धरण्याची क्षमता नसल्यामुळे कुणबी-मराठ्यांचा मोठा हिस्सा एकीकडे अल्पभूधारक शेतकरी झाला आहे, तर मोठ्या संख्येने मराठे शेतमजूर सुद्धा बनले आहेत. भांडवली विकासाच्या असमानतेचाच परिणाम आहे की मराठवाड्या सारख्या प्रदेशांचा खूप कमी विकास झाला आहे, तर पश्चिम महाराष्ट्रासारख्या प्रदेशांचा आणि त्यातही पुणे, नाशिकसारख्या शहरांचा जास्त. त्यामुळे **भांडवलशाहीत निर्माण होणाऱ्या अत्यल्प रोजगाराच्या संधीसुद्धा स्वाभाविकपणेच मराठवाड्यासारख्या प्रदेशातील, अल्पभूधारक व शेतमजूर कुटुंबातील युवकांच्या वाट्याला फारच कमी येतात.** एका अंदाजानुसार 65 टक्के मराठे गरीब आहेत, तर फक्त 4 टक्के मराठ्यांकडे 20 एकरांपेक्षा जास्त जमीन आहे. अजून एका अंदाजानुसार 60 ते 65 टक्के मराठे कच्च्या घरात राहतात. हे स्तरीकरण स्पष्टपणे भांडवली व्यवस्थेचा परिणाम आहे. मनोज जरांगे याच वर्गीय व जातीय पार्श्वभूमीतून पुढे आलेले नेतृत्व आहे. मनोज जरांगेंचे वडील दुष्काळी परिस्थितीमुळे बीड जिल्ह्यातील गावातून जालन्यातील मोहिते वस्तीत रहायला आले. शिक्षण 12 वी पर्यंत झाल्यानंतर त्यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्यावर काम सुरू केले. शेतमजुरी आणि हॉटेल मध्ये काम करण्यापासून ते काँग्रेस पक्षात काही काळ राहून नंतर शिवबा संघटना स्थापन करत, मनोज जरांगे यांनी जवळपास 2011 पासून या आंदोलनाचे काम केले आहे. गरिब शेतकरी व शेतमजूरांच्या समस्यांचे मूळ भांडवली व्यवस्थेत न बघता, मर्यादित संधींच्या आरक्षणात बघणाऱ्या जरांगेंनी आरक्षणाच्या प्रश्नावर कामाकरिता त्यांनी आपली 2एकर जमीनही विकली. कष्टकरी वर्गातून येणारे जरांगे भांडवलशाहीने निर्माण केलेल्या गरिब कृषक वर्गाचे उदाहरण आहेत.

मराठा आरक्षणाचे आंदोलन राज्याच्या विविध भागांमध्ये होत असले, तरी या आंदोलनाचा केंद्रबिंदू मराठवाडा आहे हे स्पष्टपणे दिसून येते आहे. मराठवाड्यातील अल्पभूधारक शेतकरी तसेच शेतमजूर कुटुंबातून येणाऱ्या युवकांना उपलब्ध होत असलेल्या नगण्य संधी हे यामागचे कारण आहे. एकीकडे अत्यंत अल्प प्रमाणात का होईना एस.सी., एस.टी. युवकांना आरक्षणाच्या आधारे मिळणाऱ्या संधी व त्यामुळे स्वत:ला उच्च समजणाऱ्यांना सतावणारी ऐतिहासिकरित्या बाळगलेली उच्चभ्रूपणाची मानसिकता, दुसरीकडे "प्रस्थापित" मराठा नेतृत्वाकडून (नेते, कारखानदार, शिक्षणसम्राट, उद्योगपती, बिल्डर, शेठ, इत्यादी) कडून झालेली निराशा यातून एकीकडे जातीअंतर्गत वर्गीय भेदांचे भेडसावणारे वास्तव आणि दुसरीकडे क्षत्रिय असल्याचा वृथा अभिमान यामध्ये फसलेल्या मराठा बेरोजगार युवकांची संधींची अपेक्षा आज मराठा आरक्षणाच्या मागणीच्या रूपात उफाळून आली आहे. यातूनच एकीकडे दलित व इतर मागासवर्गीय यांच्याबद्दल जातीय आकसातून टीका करणारी वक्तव्ये व व्हिडिओ बनवले जात आहेत, तर दुसरीकडे मराठा नेतृत्वाकडून झालेली निराशा समोर येत आहे.

वाढलेली वर्गीय दरी आज मराठा-कुणबी तणावात स्पष्टपणे दिसून येत आहे. "**कुणबी शब्दाची लाज वाटते त्यांनी शेती विकून चंद्रावर जावे**" असे जरांगेंनी म्हणणे आणि "क्षत्रिय" म्हणवू पाहणाऱ्या मराठ्यांच्या वतीने सर्व मराठे कुणबी नाहीत, शेती इतर जाती सुद्धा करतात असे म्हणत, आणि कुणबी नोंदी झाल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील 95 टक्के मराठे आरक्षणापासून वंचित राहतील अशी घोषणा 96 कुळी मराठा नेत्यांनी करणे याच **वर्गीय तफावतीची अभिव्यक्ती आहे.**

## अस्मितावादाला खतपाणी घालण्यासाठी सर्वपक्षीय एकता

आंदोलनामध्ये कष्टकरी आणि कामगार वर्गातून येणाऱ्या मराठा बेरोजगार युवकांची मोठी संख्या आहे. त्यांची भांडवलदार वर्गाचा हिस्सा असलेल्या उच्चभ्रू मराठा नेतृत्वाकडून झालेली निराशा आता अधिक आक्रमकपणे समोर येणे सुरू झाले आहे. या आंदोलनाच्या एकंदरीत चरित्रामध्ये राजकीय-वैचारिक भरकटलेपण असतानाही स्वत:स्फूर्ततेचा भाग मोठा असल्याचे, आंदोलनाची धार खालूनही वाढत असल्याचे समोर येत आहे. नेत्यांना गावबंदी, सभाबंदी सारख्या पावलांमुळेही जी धार दिसून आली आहे. थोडक्यात मराठा अस्मितेच्या आंदोलनाचे नेतृत्व आता प्रस्थापित बड्या भांडवलदार सत्ताधारी वर्गातील मराठ्यांच्या हातातून जाण्याची शक्यता सुद्धा दिसत आहे.

भारतात भांडवली व्यवस्थेला जातीय अस्मितांच्या राजकारणाची गरज आहेच. भांडवली निवडणुकांमध्ये वर्ण, लिंग, जात, व इतर अस्मितांचे राजकारणच भांडवलदार वर्गाला नेहमी विविध मुद्दे व आयुधे निर्माण करून देत राहते. देशात जातीय अस्मितांचे राजकारण व्हावे ही सर्वच भांडवली पक्षांची गरज आहे, फक्त त्याचे नेतृत्व त्या-त्या जातीतील भांडवलदार, उच्चभ्रू वर्गांच्या हातात म्हणजेच नियंत्रणात आणि राज्यसत्तेच्या चौकटीत राहिले पाहिजे ही त्यांची पूर्वशर्त आहे. याचा अर्थ हा निश्चित नव्हे की असे अस्मितावादी आंदोलन इतर नेतृत्वाच्या हाती योग्य ठरते. परंतु नुकत्याच उभ्या झालेल्या **आंदोलनाने संपत्तीधारक मराठ्यांविरूद्ध दर्शवलेले रूप निश्चितपणे सर्व पक्षांमधील बड्या भांडवली नेतृत्वाला चिंता करण्यास लावणारे** आहे.

आरक्षणावरून भांडवलदार वर्गाचे द्वंद्व समजले पाहिजे. आरक्षणावर असलेले 50 टक्क्यांचे वा तत्सम बंधन ही एकीकडे जास्त वेगवान भांडवली विकासाची गरज आहे, कारण कोणत्याही जातसमूहातील जास्त "सक्षम" व्यक्तींना कमीत कमी मजुरीत कामाला लावता येणे आणि कामगारांच्या निवडीचे पूर्ण स्वातंत्र्य असणे ही मालक वर्गाची गरज असते, आणि आरक्षणामुळे त्याला काही प्रमाणात का होईना छेद जातो. दुसरीकडे भांडवली विकासाच्या परिणामी निर्माण होणारी बेरोजगारी राजकीय असंतोषाला जन्म देत राहते, ज्याला नियंत्रणात ठेवण्याकरिता अस्मितेचे व आरक्षणाचे राजकारण याच वर्गाच्या कामीही येते. यात अस्मितेचे राजकारण बड्या भांडवलदार वर्गाच्या नियंत्रणात राहणे ही राजकीय स्थिरतेची गरज नक्कीच असते.

या सर्व जाणीवेमुळेच शिंदे, फडणवीसांसहित धनिक शेतकरी वर्गाचे प्रमुख नेते असलेले शरद पवार व इतर नेत्यांची संयुक्त बैठक होऊन आश्वासन देण्यात आले की 24 डिसेंबर पर्यंत निर्णय होईल. ही सत्ताधारी वर्गाची वर्गएकताच आहे, अन्यथा, शिंदे, फडणवीस सरकारला धारेवर धरण्याचे काम विरोधी पक्षांनी का केलेले नाही? ज्यांच्या नोंदी सापडतील त्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गातून आरक्षणाची घोषणा करत, ऐतिहासिक कुणबी नोंदी शोधण्याचे कामही सरकारने लगोलग हाती घेतले आहे. सोबतच हे सुद्धा विसरू नये की एखाद्या आंदोलनाला कह्यात आणण्यासाठी त्याच्या नेतृत्वाला लालूच देणे, नेतृत्वाचे दमन करणे, खोटे-नाटे आरोप करून आंदोलनाचे दमन करणे, आंदोलनाला भरकटवत व भडकावत त्याच्या दमनाची संधी तयार करणे या राज्यकर्त्यांच्या क्लृप्त्या देशाने 75 वर्षे अनुभवल्या आहेत. याचाच भाग म्हणून सरकार मध्येच मंत्रीपदी असलेले छगन भुजबळ व काँग्रेससहीत पक्षांमधील ओबीसी नेत्यांची संयुक्त आघाडी बनवून ओबीसी-मराठा तेढ वाढवण्याची योजना अंमलात आणली गेली आहे, आणि जरांगेंच्या नेतृत्वाला आव्हान देणारी पावले टाकणे सुद्धा सुरू केले गेले आहे. **सर्वच प्रमुख पक्षांनी दोन्ही आंदोलनांना दिलेला पाठिंबा यासाठीच आहे की अस्मिता भडकवून, परिस्थिती चिघळवून आंदोलनांना भरकटू द्यावे.**

## रोहिणी आयोग, ओबीसी अंतर्गत आरक्षणाची मागणी

आरक्षणाच्या मागणीची बनलेली निरर्थकता यातूनही दिसून येते की आता ओबीसी अंतर्गत विविध गट करून त्यांना आरक्षण देण्याची मागणी पुढे गेली आहे. ओबीसींच्या 633 जातींमधील मूठभर जातींनाच या आरक्षणाचा फायदा पोहोचल्याचे दिसून आले आहे. भांडवली स्पर्धेत ओबीसींमधील (आणि इतर जातसमूहांमधील सुद्धा) अधिक संपन्न जातीतील लोकच तुलनेने जास्त पुढे राहिले आहेत, आणि स्पर्धेवर आधारित भांडवली व्यवस्थेत असेच होऊ शकते. यातून निर्माण होत चाललेल्या असंतोषावर तोडग्याकरिता मोदी सरकारने रोहिणी आयोग नेमला आहे, ज्याच्या शिफारशींनुसार ओबीसींमध्ये 4 गट करून त्यांच्यामध्ये 27 टक्के ओबीसी आरक्षण विभागले जाणार आहे. **ओबीसी मध्ये सुद्धा आरक्षणाचा फायदा आता त्यातील पुढारलेल्या वर्गालाच मिळत आहे.** यामुळेच ओबीसी आणि इडब्ल्युएस मुलींची फी सरकार भरणार असे जाहीर करत ओबीसी कामगार-कष्टकऱ्यांच्या असंतोषाच्या आगीवर पाण्याचे थिंतोडे उडवण्याचे काम सरकारला करावे लागत आहे. ओबीसींच्या सुद्धा एका अत्यल्प गटालाच आरक्षणाचा फायदा पोहोचला आहे, आणि तसेच होऊ शकते कारण आरक्षणाची कल्पनाच तशी आहे. **रोहिणी आयोगाचे बनणे सुद्धा याच गोष्टीची साक्ष आहे की ओबीसींमधील वर्गविभाजन सुद्धा तीव्र झालेले आहे.**

"**20-50 एकरचा शेतकरी आज पाच एकरवर आला असेल, पण ज्याच्याकडे दोन एकरही नाही तो वीस पिढ्यांतही कुठे असेल याचा विचार तुम्ही करणार नाही?**" असे विजय वडेट्टीवारांनी मराठ्यांना प्रती प्रश्न करत ओबीसी एल्गार परिषदेत म्हटले. धनिक शेतकऱ्यांचे राजकारण करणाऱ्या काँग्रेस पुढाऱ्यांचे हे नक्राश्रू असले, तरी वस्तुस्थिती मांडल्याशिवाय जनतेच्या भावनेला हात घालणे शक्य नसते. **आज मराठा असो वा ओबीसी वा इतर कोणत्याही जातीतील अल्पभूधारक शेतकरी वा भूमीहीन शेतमजूर, यांचे हित एक आहे, आणि ते त्या-त्या व सर्व जातीतील धनिक शेतकरी वर्गाच्या विरोधात आहे याची जाणीव मारण्याचे काम वडेट्टीवारांसारखे नेते अर्धसत्य मांडून करत आहेत.** प्रत्येक जातीतील गरिब कामगार-कष्टकऱ्यांच्या नावाने आरक्षण मागितले जात आहे, जी मूळातच एक अत्यंत नगण्य संधींची मागणी आहे, आणि ह्या नगण्य संधींचे वाटेकरी सुद्धा त्या-त्या जात व जातसमूहातील मध्यमवर्ग, उच्च-मध्यमवर्ग आणि भांडवलदार वर्गच बनणार आहे कारण की भांडवली स्पर्धेत टिकण्याची तुलनात्मक जास्त क्षमता याच वर्गांकडे असते.

## जरांगेचे अस्मितावादी आंदोलन

जरांगेची वैयक्तिक सामाजिक पार्श्वभूमी जरी कष्टकरी वर्गाची असली, आणि त्यांच्या आवाहनाची भाषा ग्रामीण गरिबांना केंद्रस्थानी ठेवून असली, तरी विचारधारात्मकरित्या, राजकीयरित्या ते अस्मितावादी विचारांचेच, एका निम्न-भांडवली विचारधारेचेच प्रतिनिधी आहेत. मराठ्यांमधील कामगार कष्टकरी वर्गाच्या अपेक्षांची भरकटलेली अभिव्यक्ती असले तरी हे आंदोलन अस्मितावादीच आहे, आणि त्यामुळेच कामगार-कष्टकरी वर्गाने यापासून दूर राहणे गरजेचे आहे. प्रत्येक अस्मिता ही तिच्या विरोधातील अस्मितेला जन्म देते, खतपाणी घालते. मराठा अस्मितेचे राजकारण त्यामुळेच कधी विरोधात दलित अस्मितेला, कधी ओबीसी अस्मितेला तर कधी इतर अस्मितांना शत्रू म्हणून जन्म देते, तणावही भडकावते आणि कामगार-कष्टकऱ्यांची वर्गएकता बाधित करते.

जरांगेंच्या व्यक्त विचारांच्या केंद्रस्थानी गरीब मराठे असले तरी मराठा म्हणून मांडलेली अस्मिता त्यांना उच्चवर्गीय मराठ्यांपासून विभक्त करत नाही, तर एकत्र यायला भाग पाडते. म्हणूनच धनिक शेतकरी वर्गाचे नेते असलेले संभाजीराजे जेव्हा भेटायला येतात, तेव्हा "छत्रपतींच्या वंशजां"च्या उपस्थितीने जरांगे भावनाशील होतात, आणि प्रस्थापित मराठा नेत्यांवर जरांगे आगपाखड तर करतात, परंतु उदयनराजेंसारख्यांच्या भेटीही घेतात, आणि धनिक मराठ्यांच्या काही हिश्श्यांच्या मदतीने सभाही करताना दिसतात. "अगोदर आरक्षण मिळवा, आणि मग हव्या त्या पक्षाचे राजकारण करा" म्हणणारे जरांगे राजकारणाच्या वर्गवास्तवावर प्रहार करताना दिसत नाहीत आणि स्वत:चेही पर्याय खुले ठेवतात, आणि "95 टक्के मिळवूनही आमची मुले घरी" म्हणताना तीच भाषा येते जी इतर उच्चवर्णीय 'मेरिट'च्या नावाने आरक्षणा विरोधात सतत करत आले आणि त्यामुळे यात निशाणा आरक्षण मिळवणारे इतर जातघटकच असतात. "जाणूनबुजून षडयंत्र रचण्यात आलं, 70 ते 75 वर्षांपासून सत्ताधारी मंडळींवर ओबीसी नेत्यांचा प्रचंड दबाव होता, मराठ्यांना आरक्षण असूनही लाभ दिला नाही." असे म्हणणारे जरांगे राज्यातील राजकारणावर असलेला उच्चभ्रू मराठा वर्गाचा दबदबा दुर्लक्षित करतात आणि ओबीसी अस्मितेला आव्हानही देतात. अशाप्रकारे सर्व कामगार-कष्टकरी वर्गाचे हित हे जरांगेंच्या विचारधारेमध्ये कुठेही नाही.

अशामध्ये ओबीसी आणि दलित समुदायांचा एक हिस्सा मराठा आरक्षणाच्या मागणीच्या बाजूने उभा आहे असे दिसते; परंतु ब्राह्मण-विरोधी तथाकथित "बहुजन"वादी राजकारणाच्या प्रभावाखाली हे समर्थन होत आहे, जी स्वत: एक वेगळी अस्मितावादी मांडणीच आहे. दीर्घकालिकरित्या पाहिले तर अशा सर्व प्रकारच्या अस्मितावादांच्या राजकारणाचा भाजपच्या हिंदुत्ववादी फॅशिझमला फायदाच होतो, कारण ते यातले पटाईत खेळाडू आहेत, आणि त्यांना जाणीव आहे की निराशा झाल्यानंतर, आणि जातीय अस्मितांची निरर्थकता जाणवू

पान 5 वर

# 6 महिन्यांच्या वांशिक संघर्षानंतर दुभंगलेल मणिपूर: भाजपच्या जातीयवादी राजकारणाची परिणती

✎ सुप्रित

8 नोव्हेंबर रोजी इंफाळमध्ये दोन कुकी-झो व्यक्तींचे मृतदेह सापडले. इंटरनेट बंदी आता 13 नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. मणिपूरमध्ये वांशिक संघर्ष सुरू झाल्यानंतर सहा महिन्यांनंतर, गृह मंत्रालयाने, एन.आय.ए.च्या मार्फत शेवटी एकदाचा "योग्य शत्रूला" दोष देण्याचा निर्णय घेतला आहे. "बेकायदेशीर स्थलांतरित", "कुकी अतिरेकी/दहशतवादी", "अफू पिकवणारे", "ड्रग विक्रेते", "नार्को-दहशतवादी" असे अनेक दोषारोपाचे प्रयत्न केल्यानंतर आता कुठे गृह मंत्रालयाच्या लक्षात आले की हे संकट खरे तर दुसरे काही नाही तर आणखी एक आंतरराष्ट्रीय 'षडयंत्र' आहे: विश्वगुरु मोदी आणि भारताची बदनामी करण्याचे 'षडयंत्र'. एन.आय.ए.च्या म्हणण्यानुसार, "म्यानमार आणि बांगलादेशातील दहशतवादी गटांनी भारतात हिंसक कारवाया करण्यासाठी, विविध समुदायांमध्ये तेढ निर्माण करण्यासाठी आणि भारत सरकारविरुद्ध युद्ध पुकारण्यासाठी भारतातील दहशतवादी गटांच्या एका विभागासोबत कट रचला आहे."

परकीय शक्तींचे एजंट्स राज्यात दंगल घडवून आणत असल्याचा आरोप झाल्याने भयंकर चिताक्रांत होण्याऐवजी मुख्यमंत्री बिरेन सिंह मात्र मीडियासमोर विलक्षण शांत दिसत होते, त्यांनी केंद्र सरकारचे मोठे आभार मानले आणि "माननीय पंतप्रधान मोदीजी" आणि "मा. गृहमंत्री अमित शाहजी" यांचे विशेषत: त्यांच्या पाठिंब्याबद्दल व्यक्तिशः आभार मानले. सिंह यांना हायसे वाटणे स्वाभाविक आहे कारण एन.आय.ए.ने जाहीर केलेले वक्तव्य हे खरे तर एका विश्वासू सैनिकाप्रती फॅशिस्ट सरकारने जाहीरपणे व्यक्त केलेला विश्वास आहे. बिरेन सिंग यांच्या द्वेषाच्या राजकारणाला तर आता देशातील द्वेष-प्रमुखाकडून योग्य मान्यता मिळाली आहे आणि आता त्यांना कुकींविरुद्ध विष पसरवण्याची आणि प्रतिक्रियावादी मेईतेई गटाला त्याची उद्दिष्टे साध्य होईपर्यंत




चिथावणी देण्याची मोकळीक मिळाली आहे, आणि सर्व दोष औपचारिकपणे म्यानमार आणि बांगलादेशमधील अज्ञात व्यक्तिंच्या माथी थोपवला गेला आहे.

द्वेष-प्रमुखांच्या आश्वासनंतरही बिरेन सिंह यांची चिंता मात्र कायम आहे. गेल्या काही महिन्यात राज्यभर मेईतेई, कुकी आणि नागा अशा सर्वच समूहांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. इम्फाळमध्ये 23 सप्टेंबर रोजी कुकी अतिरेक्यांनी कथितरित्या 12 वीच्या दोन विद्यार्थ्यांच्या केलेल्या हत्येच्या निषेधार्थ झालेल्या आंदोलनाची सरकारने क्रूर दडपशाही केली, ज्यात जलद कृती दल (सीआरपीएफची विशेष दंगल नियंत्रण शाखा) मॉक बॉम्ब, अश्रुधुराचा वापर आणि पॅलेट गन्सचा वापर केला गेला. नि:शस्त्र विद्यार्थ्यांवर (शालेय गणवेशातील) धातूच्या गोळ्या (पॅलेट), अगदी निशाणा धरून वापरल्या गेल्यामुळे तीव्र टीका झाली आहे. या हल्ल्यात 50 हून अधिक विद्यार्थी आणि 8 अल्पवयीन गंभीर जखमी झाले आहेत. "ते पाण्याच्या तोफांचा वापर करू शकले असते किंवा विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करू शकले असते. पण त्यांना विद्यार्थी आंदोलकांवर हल्ले करण्यासाठी पेलेट गन का वापरावी लागली? त्यांनी दिल्ली, मुंबई किंवा भारताच्या इतर भागात आंदोलन करणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांवर पेलेट गन वापरल्या आहेत का? मग मणिपूर का?" असे एका 17 वर्षीय जखमी विद्यार्थ्याच्या वडिलांनी न्यूजलँड्री या ऑनलाइन पोर्टलशी बोलताना विचारले. त्याच्या मुलाला 90 गोळ्या मारण्यात आल्या होत्या आणि आता कदाचित सहा महिन्यातही तो बरा होणार नाही. हे लक्षात घ्यावे की एकामागोमाग एक केंद्र सरकारांनी काश्मीरमधील आंदोलकांच्या विरोधात पॅलेट गन वापरून, त्यांच्या डोळ्यांना लक्ष्य करून आणि त्यांना अंध बनवून (एकट्या 2016 ते 2018 दरम्यान 1,253 लोक काश्मीरमध्ये सुरक्षा दलांनी वापरलेल्या धातूच्या छर्‍यांमुळे आंधळे झाले. "जगातील ही पहिली अंध-करण्याची व्यापक मोहीम आहे का?" असे यूकेच्या द गार्डियन वृत्तपत्राने विचारले होते!) भारतातील लोकांना हे पटवून दिले आहे की आंदोलकांवर पेलेट गनचा वापर "स्वीकारण्यायोग्य" आहे.

विद्यार्थ्यांच्या दमनाविरोधात आलेल्या जनतेच्या प्रतिक्रियेमुळे सरकारला या घटनेचा तपास सीबीआय कडे सोपवावा लागला, ज्यांनी आतापर्यंत 6जणांना अटक केली आहे. परंतु सीबीआयने चार्जशीट सुद्धा दाखल केली नसताना, बिरेन सिंह यांनी जाहीर केले की "(त्यांना) आनंद आहे की (दोन विद्यार्थ्यांच्या) अपहरण आणि हत्येचे काही मुख्य गुन्हेगार" पकडले गेले आहेत आणि सरकार "त्यांना त्यांच्या गुन्ह्यांकरिता फाशीसह जास्तीत जास्त शिक्षा" देण्यासाठी कटिबद्ध आहे. दिसून येत आहे की केंद्र आणि राज्य सरकारांना न्यायाशी जास्त देणेघेणे नसून लोकांच्या भडकावलेल्या भावनांना वळण लावण्यात रस आहे, आणि म्हणूनच आरोपपत्र दाखल होण्यापूर्वीच आरोपींना गुन्हेगारच घोषित केलेले नाहीये तर फासावरही चढवले आहे. हे विसरता कामा नये की मणिपुर मध्ये गेल्या 6 महिन्यात अशा शेकडो घटना घडल्या आहेत (ज्यात एका महिलेच्या बलात्काराच्या समोर आलेल्या व्हिडिओने देशाला हादरवले होते, ही घटना सुद्धा सामील आहे), ज्यांमध्ये राज्य सरकार चूप्प, निष्क्रिय, वा अगदी सामील सुद्धा राहिलेले आहे.

बिरेन सिंह यांनी सतत अस्मितावादी मेईतेई चळवळींचे केलेले समर्थन, आणि मेईतेई लिपून सारख्या व अरंबाई तेन्गोल सारख्या चळवळींचे केलेले रक्षण ह्या त्या बाबी आहेत, ज्यांनी मणिपुरमध्ये तणाव वाढवण्यात मोठी भुमिका निभावली आहे. न्युजक्लिकला दिलेल्या एका मुलाखतीत मानवाधिकार कार्यकर्ते बबलू लोईतोंगबम यांनी मेईतेई लिपुनची तुलना आर.एस.एस. सोबत केली आहे आणि म्हटले आहे की त्यांनी पसरवलेल्या विद्वेषामुळे एकही (कुकींचे) चर्च आता इंफाळ खोऱ्यात राहिले नाही. यानंतर मेईतेई लिपुनने लोईतोंगबम यांच्या घरावर हल्ला केला आणि मागणी केली की त्यांनी यापुढे मीडीयामध्ये एकही वक्तव्य

पान 2 वर

# मराठा-ओबीसी आरक्षण संघर्ष

पान 4 वरून

लागल्यानंतर, देशाला "एक" करण्याच्या नावाने मुस्लिमविरोधाला धार देऊन हिंदुत्वाच्या अस्मितेचा विचार अजून पुढे ढकलता येतो. आसाममधील प्रादेशिक अस्मितेचे आंदोलन असो, वा या अगोदरचे मराठा अस्मितेचे, वा इतर राज्यातील जाट, गुर्जर, इ. अस्मितांचे, यांनी अंतिमत: भाजपलाच फायदा पोहोचवला आहे.

### बेरोजगारीची भीषण स्थिती

आरक्षणाच्या मागणीने पुन्हा एकदा चर्चाविश्व व्यापले गेले आहे आणि कोट्यवधी युवकांच्या जीवनाची भीषण स्थिती झाकोळली गेली आहे. खाजगीकरण, कंत्राटीकरणाने पक्क्या रोजगाराला जवळपास संपवले आहे. यामुळेच मुठभर सरकारी नोकऱ्यांकरिता प्रचंड संघर्ष निर्माण झालेला आहे. वार्षिक रोजगार वाढीचा दर 1980-1900 मधील अल्प अशा 2 टक्क्यांवरून 2010-2020 मध्ये 0.2 असा अत्यल्प झाला आहे. 9 वर्षात 22 कोटी अर्ज प्राप्त जालेले असताना मोदी सरकारने फक्त 7 कोटी रोजगार दिले आहेत. एकेका जागेकरिता 5 हजारापर्यंत अर्ज येणे ही आज सामान्य बाब झाली आहे आणि कोट्यवधी तरुण हताश होऊन मिळेल ते जुजबी काम करायला तयार आहेत हे धडधडीत वास्तव समोर आहे.

जागाच नसताना आरक्षणाच्या मागणीला काय अर्थ उरला आहे? ओबीसींचेच उदाहरण घेऊन गणित करुयात. काही शे जागा देऊ करणाऱ्या एम.पी.एस.सी. परिक्षेचा अर्ज भरणाऱ्यांची संख्या आता 4 लाखापर्यंत आली आहे. 2022 मध्ये 420 जागांकरिता 3.7 लाख विद्यार्थ्यांचे अर्ज आले होते. 420 जागांपैकी 27 टक्के दराने 113 जागा ओबीसींच्या वाट्याला येतात, जेव्हा की 3.7 लाख चे 27 टक्के (उदाहरणाकरिता असे मानूयात की तेवढ्याच ओबीसी उमेदवारांचे अर्ज आले, तरी) जवळपास 1 लाख होतात. 1 लाख लोकांमागे फक्त 113 इतक्या नाममात्र जागा आरक्षणातून ओबीसी उमेदवारांना मिळत असताना, या 113 जागांपैकी मराठा/कुणबी व ओबीसी अशी वाट्याची भांडणे चालू असताना जागाच नाहीत या वास्तवाला, नोकरीची संधी नाकारल्या जाणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या हिताला, रोजगार अधिकाराच्या मागणीला तिलांजली दिली जात आहे! खाजगीकरण, कंत्राटीकरण वाढवणाऱ्या सर्व प्रमुख राजकीय पक्षांना याची चांगलीच जाणीव आहे, आणि म्हणूनच मराठा व ओबीसी या दोन्ही आरक्षणाच्या बाजूने, आणि जातीय तणाव भडकावण्यात सुद्धा सर्वपक्षीय युती दिसून येत आहे.

अजून एक उदाहरण बघूयात. पुण्यात नेट-सेट पीएचडी धारक उच्चशिक्षित विद्यार्थी, जे महिन्याला 6 ते 7 हजारात काम करण्यास मजबूर आहेत, रोजगाराच्या मागणीला घेऊन आंदोलन करत आहेत; प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरल्या जाव्यात, तासिका तत्त्वावरील काम बंद करावे, विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये पूर्णवेळ भरती करावी अशा मागण्या करत आहेत. खरे तर या मागणीला घेऊन अनेक वर्षांपासून आंदोलन होत आले आहे. या प्रश्नाने सर्वजातीय विद्यार्थी ग्रस्त आहेत. अशाच प्रकारची आंदोलने इतर अनेक राज्यात झाली आहेत. एमपीएससी च्या विद्यार्थ्यांची असंख्य आंदोलने, शिक्षकभरतीची अनेक राज्यातील आंदोलने, अग्नीवीर योजनेविरोधातील आंदोलने, रेल्वेभरतीचे आंदोलन, अशा अनेक आंदोलनांतून दिसून येते की बेरोजगारीविरोधात देशात राजकीय वातावरण तापत आहे. नुकतेच स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या रोषाला सामोर जात शिंदे-फडणवीस-पवार सरकारने सरकारी कंत्राटी भरतीचा निर्णय मागे घेतला, परंतु कंत्राटीकरण मात्र थांबलेले नाही.

अशी असंख्य उदाहरणे आहेत. परंतु आज जातीय अस्मितांचे आरक्षणाचे आंदोलन या सर्व लढ्यांच्या विरोधात काम करत आहे. आरक्षण ही गरिबी हटावची योजना नाही, ते प्रतिनिधित्व आहे असे छगन भुजबळ पुन्हा एकदा ओरडले. आरक्षणाचे पारंपारिक समर्थक आज ही घोषणा सतत करत आहेत. परंतु गरिबी हटावची, म्हणजेच पर्यायाने सर्वांना रोजगाराची योजना काय आहे यावर मात्र कोणीही बोलायला तयार नाही! कोणत्याही जातीतील अत्यल्प युवकांना संधी मिळाल्याने त्या जातीतील इतर कामगार-कष्टकऱ्यांचे कोणते हित साध्य होते ह्या प्रश्नाला झाकोळण्याचे काम अस्मितावादी राजकारण करते.

"जिसकी जितनी संख्या भारी उसकी उतनी हिस्सेदारी" सारखे नारे देत आज सरकारी पदांमध्ये, म्हणजेच राज्यसत्तेमध्ये व पर्यायाने लुटीमध्ये प्रत्येक जातीतील मूठभरांना संधी देण्याचा नारा जोर धरत आहे. भाजपच्या हिंदुत्वाच्या फॅशिस्ट राजकारणाला पर्याय म्हणून काँग्रेससारखे भांडवली पक्षही या अस्मितावादी नाऱ्याला उचलत आहेत! उदारीकरणाचे वारे 1991 मध्ये आणल्यापासून वाढलेल्या प्रचंड विषमता आणि बेरोजगारीच्या स्थितीत तर मुद्दा भरकटवण्याकरिता जातीय ध्रुवीकरण हे राजकारणाचे एक अत्यंत महत्त्वाचे हत्यार आहे याची सर्व प्रमुख भांडवली पक्षांना जाणीव आहे, आणि म्हणूनच ही सर्वपक्षीय एकता निरर्थक मागण्यांच्या उभी राहून एकीकडे जनतेला भरकटवत आहे, भडकावत आहे आणि दुसरीकडे मागण्या मान्य झाल्या तरी तोंडाला पाने पुसण्याचेच उद्दिष्टही साध्य करणार आहे.

अस्मितावादाचे कोणतेही राजकारण हे आपल्या हिताविरोधात आहे. सर्वांना शिक्षण आणि सर्वांना रोजगार या कामगार-कष्टकऱ्यांच्या नाऱ्याला पुढे नेत, जातीविरोधी भुमिका घेणारी कामगार-कष्टकरी एकजूट हाच सर्व जातींमधील ग्रामीण व शहरी गरिबांच्या राजकारणाचा एकमेव योग्य मार्ग आहे.

# महिला आरक्षणावर कामगारवर्गीय दृष्टिकोन काय असावा?

पान 1 वरून

**सर्वांना समजू लागले आहे. महिलांसाठी असुरक्षित देशांच्या यादीत भारताने अव्वल स्थान प्राप्त केले आहे. त्याच वेळी दुसरीकडे बृजभूषण सिंह सारख्या गुंड आणि पतित तत्त्वांनी भाजपच्या चाल-चेहरा-चरित्राला देशातील महिलांसमोर उघडे पाडले आहे. याच काळात स्त्रियांच्या शोषण-दमन-छळात देशाने जी प्रगती केली आहे, ती अभूतपूर्व आहे. उन्नाव, कठुआ, हाथरस, बिल्कीस-बानो पासून ते मणिपुर पर्यंतच्या घटना या काळाच्या बिभत्सतेची साक्ष आहेत.**

संघ-भाजपचे लोक महिलांना मुलं पैदा करायची मशीन आणि पुरुषांच्या पायातील वहाण समजतात, आणि समाजातही याच मानसिकतेला खतपाणी घालतात. नवउदारवादाच्या काळात, नव-धनाढ्यांच्या “खा-प्या-मजा करा”च्या संस्कृतीमुळे, जी महिलांना फक्त उपभोगाची आणि विनिमयाची वस्तू म्हणून एका मालाप्रमाणे बघते, महिला-विरोधी गुन्ह्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे, आणि आता फॅसिझमच्या काळात तर तिचे वावटळीत रुपांतर झाले आहे. **महिलांच्या गुलामीला न्याय्य ठरवणारे हे फॅसिस्ट सरकार महिला आरक्षणाच्या माध्यमातून पुन्हा एकदा महिलांची हितरक्षक असल्याचा दावा करत आहे, जेणेकरून 2024 च्या लोकसभा निवडणुकांमध्ये मतांची बेगमी करता येईल. महिला आरक्षणामागे त्यांचा खरा इरादा निवडणूक तयारीचाच आहे.**

**विधेयकात म्हटले आहे की लोकसभा, राज्यांच्या विधानसभा आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्र असलेल्या दिल्लीच्या विधानसभेत एक तृतीयांश जागा महिलांसाठी आरक्षित असतील. पहिला प्रश्न तर याच निर्माण होतो की संसदेत आणि विधानसभांमध्ये महिलांना आरक्षण मिळाल्यामुळे काय बदलेल? यामुळे महिलांचा विकास आणि स्वातंत्र्याची हमी मिळेल का? उदाहरणाकरिता आपण जिथे महिला आरक्षण लागू आहे त्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पाहिले तर दिसते की तिथेही महिलांचे असणे फक्त प्रतिकात्मकच सिद्ध झाले आहे. भले काही महिला सरपंच किंवा नगरसेवक निवडल्या गेल्या असतील, परंतु बहुतेक ठिकाणी सर्व निर्णय घेण्याचे काम त्यांचा पती किंवा पिताच करतात! जर एका मिनिटासाठी असे मानले की निवडून आल्यावर सुद्धा या महिला स्वत:च निर्णय घेतात, तरी सुद्धा ज्या महिला राजकीयदृष्ट्या भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधित्व करतात, त्या जनतेच्या बाजूने निर्णय कशा घेऊ शकतील? तुम्हाला स्मृती इराणी, मीनाक्षी लेखी, ममता बॅनर्जी सारख्या भांडवली भांडवली नेत्यांकडून जनतेच्या बाजूने काही केले जाण्याची आशा आहे? यांचे सत्य गेल्या काही वर्षात तुम्ही पाहिलेले नाही ?**

म्हणूनच यामुळे काही फरक पडत नाही की राज्य करणारी स्त्री आहे की पुरुष! एका पितृसत्तात्माक समाजात महिला लांच्या गुलामीला अस्मितावादाचे खेळ खेळणाऱ्या अशा काही कायद्यांद्वारे संपवले जाऊ शकत नाही. ज्यांना असे वाटते की समाजाच्या कणाकणात बसलेल्या पुरुषी वर्चस्ववादी मानसिकतेला काही नियम-कायदे करून संपवले जाऊ शकते, ते लोक ना इतिहासाच्या गतीला समजतात आणि ना या व्यवस्थेच्या काम करण्याच्या पद्धतीला. आंबेडकरवादी आणि इतर अनेक अस्मितावाद्यांना वाटते त्याप्रमाणे कोणतेही परिवर्तन फक्त “महान किंवा प्रामाणिक सरकारां”कडून वरून आणलेल्या कायद्यांद्वारे केले जाऊ शकत नाही. इतिहासात होणारे कोणतेही आमूलाग्र परिवर्तन जनतेच्या एकजूट संघर्षांच्या जोरावरच शक्य असते. पितृसत्ता वर्ग व खाजगी संपत्तीच्या सोबतच अस्तित्वात आली आणि तिच्यावर खरा प्रहार करण्याचे काम शोषण आणि छळणूक तसेच खाजगी संपत्ती व नफ्यावर टिकलेल्या व्यवस्थेविरोधात संघर्ष करूनच होऊ शकते, स्त्रियांना सत्तेच्या पदांमध्ये 33 टक्के आरक्षण किंवा 50 टक्के आरक्षणाद्वारे नाही.

**दुसरा प्रश्न आहे की भविष्यात जर हा कायदा लागू झाला, तरी यामुळे महिलांचे काय भले होईल?**

महिला आरक्षणामुळे भलेही काही महिला संसद-विधानसभेच्या पदांवर पोहोचतील, परंतु वास्तवात सामान्य महिलांच्या जीवनात यामुळे कोणतेही परिवर्तन होणार नाही.

एका वर्ग-विभाजित समाजात विविध वर्गांमधून येणाऱ्या महिलांचे हित एक असू शकत नाही. आपण पाहू शकतो की स्त्रियांवर होणाऱ्या भयंकर गुन्ह्यांच्या प्रकरणात सुद्धा शासक वर्गातून येणाऱ्या स्त्रिया आणि त्यांच्या भाट बनलेल्या स्त्रियांच्या गटांनी कधी तोंड उघडले असेल तर! फक्त महिला असणे हे स्वत:हून प्रगतीशील असणे नाही, जसे की अनेक अस्मितावाद्यांना वाटते. भांडवली पितृसत्तात्मक समाजात शासक वर्गातून येणाऱ्या स्त्रिया स्वत:च्याच वर्गहितांचे रक्षण करतात आणि त्याच पितृसत्तात्मक मूल्य-मान्यतांना स्थापित करण्यासाठी काम करतात ज्या स्त्रियांना दुय्यम दर्जाचा नागरिक बनवतात. स्मृती इराणी, मीनाक्षी लेखी, सुषमा स्वराज किंवा मायावती सारख्या महिला आणि देशातील शेता-कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगार महिलांच्या कोणत्या मागण्या समान आहेत? गोल्डा मेयर, मार्गरेट थॅचर, कॉंडोलिझा राईस सारख्या खूनी साम्राज्यवादी महिला, आणि इंदिरा गांधींसारख्या महिलांनीच इतिहासात भांडवलदार वर्गाच्या राज्यसत्तेच्या अग्रस्थानी राहून सर्वाधिक प्रतिक्रियावादी धोरणे लागू केली आहेत. हे तर स्पष्टच आहे की राजकीयरित्या खातापिता मध्यमवर्ग किंवा सत्ताधाऱ्यांसोबत उभ्या महिला आणि सामाजिक वर्गाच्या रूपाने कामगार वर्गातून येणाऱ्या महिलांचे ना हित एक आहे आणि ना मागण्या, उलट त्या एकदुसऱ्याच्या विरोधातच उभ्या ठाकलेल्या दिसतात. जे एकासाठी अमृत आहे, तेच दुसऱ्यासाठी विष. **म्हणूनच, या विधेयकाला सुद्धा आपल्याला वर्गीय दृष्टीकोनातूनच बघावे लागेल. वर्ग-निरपेक्ष दृष्टिकोनातून आपण महिलांच्या मुक्तीचा प्रश्न उचलूच शकत नाही, कारण स्त्रियांचा गट एका वर्गसमाजात एकाश्मी गट असूच शकत नाही.**

कामगार-कष्टकरी पार्श्वभूमीतून येणाऱ्या महिलांसाठी महिला आरक्षणाचे विधेयक एक बिनकामाचा आणि महत्त्वहीन मुद्दा आहे. त्यांना याने काही फरक पडत नाही की संसद-विधानसभेत बसून त्यांच्या लुटीची व शोषणाची धोरणे बनवणाऱ्यांमध्ये किती महिला आहेत आणि किती पुरुष, किती दलित आहेत आणि किती सवर्ण, इत्यादी! भांडवली लूटमार, पाशविकता, आणि पितृसत्तात्मक वर्चस्वाला लागू करण्यात त्या स्त्रिया सुद्धा तेवढ्याच हिस्सेदार आहेत, ज्यांचे हित शासक वर्गासोबत जोडलेले आहे. देश चालवणाऱ्या कष्टकरी महिलांना याने काय फरक पडेल की त्यांचे शोषण करणारी जमात 100 टक्के पुरुषांची आहे की 67 टक्के पुरुष व 33 टक्के स्त्रियांची? त्यांना फरक तर तेव्हा आणि तेव्हाच पडेल जेव्हा भांडवली शोषणकारी व्यवस्था नष्ट होईल. स्त्रियांना गुलाम समजणारी मानसिकता भांडवली व्यवस्थेशी नाळेने जोडलेली आहे. भांडवलशाहीने समाजाच्या कणाकणात बसलेल्या पितृसत्तात्मक मूल्य-मान्यतांना सहयोजित (को-ऑप्ट) केले आहे, ज्यामुळे स्त्रियांच्या छळाला वैध व योग्य ठरवण्याचा आधार उपलब्ध होतो. भांडवली व्यवस्थेमध्ये पितृसत्ता सामाजिक छळाचे एक महत्त्वाचे रूप आहे, जिचा फटका विशेषत: स्त्रियांना व मुलांना बसतो. या पितृसत्तात्मक मानसिकतेचा नाश आणि स्त्रियांच्या मुक्तीशिवाय जनमुक्तीचा कोणताही संघर्ष शक्य नाही.

**प्रश्न आहे पितृसत्तात्मक भांडवली व्यवस्थेला नष्ट करण्याचा. तेव्हाच कुठे खऱ्या अर्थाने अर्ध्या लोकसंख्येची मुक्ती होऊ शकते आणि याकरिता लढल्या जाणाऱ्या संघर्षात वर्गाधारित एकता स्थापित केली जाण्याची गरज आहे, ना की महिला आरक्षणासारख्या जुमल्यांमागे पळण्याची.**

**मूळ लेख: मज़दूर बिगुल, ऑक्टोबर 2023**

**अनुवाद: राहुल**

## भगतसिंह म्हणाले ...

*लोकांचे परस्परांशी होणारे झगडे थांबवण्यासाठी लोकांमध्ये वर्गभावना रुजणे आवश्यक आहे. गरीब, कष्टकरी व शेतकरी यांना हे स्पष्टपणे समजावून सांगितले पाहिजे, की तुमचे खरे शत्रू भांडवलदार आहेत. म्हणून तुम्ही त्यांच्या हातचलाखीपासून स्वत:ला शाबूत ठेवले पाहिजे. त्यांच्या तावडीत सापडून काहीही करता कामा नये. जगातील सर्व गोरगरिबांचे, मग ते कोणत्याही जातीचे, वर्णाचे, धर्माचे वा राष्ट्राचे असोत, अधिकार सारखे आहेत. धर्म, वर्ण, वंश आणि राष्ट्रीयतेचे भेदभाव संपवून तुम्ही एकजूट व्हावे आणि सरकारची शक्ती आपल्या हाती घेण्यासाठी प्रयत्न करावेत, यातच तुमचे भले आहे. या प्रयत्नांमुळे तुमचे काही एक नुकसान होणार नाही. उलट एक ना एक दिवस तुमच्या बेड्या तुटून पडतील आणि तुम्हाला आर्थिक स्वातंत्र्य मिळेल.*

*(धर्मांध दंगली व त्यावरील उपाय)*



*मानवी स्वभावात भ्रम आणि स्थितिशीलता असल्याने त्याला क्रांतीबद्दल एक प्रकारचे भय वाटत असते. सामाजिक परिवर्तने नेहमीच सत्ता आणि विशेष अधिकार उपभोगणाऱ्या वर्गांमध्ये दहशत निर्माण करीत असतात. क्रांती ही अशी एक अद्भुत गोष्ट आहे की जिच्याविषयी निसर्गाला प्रेम असते, आणि तिच्याशिवाय ना निसर्गामध्ये प्रगती होऊ शकते ना मानवी व्यवहारांमध्ये. क्रांती म्हणजे अविवेकी हत्यांची किंवा जाळपोळीची हिंसामोहिम नक्कीच नव्हे; वा इकडे तिकडे चार बॉम्ब फेकणे किंवा गोळ्या झाडणेही नव्हे; अथवा संस्कृतीची संपूर्ण नामोनिशाणी मिटवणेही नव्हे; किंवा कालौघात मान्य झालेल्या न्याय आणि समतेच्या तत्त्वांच्या ठिकऱ्या उडवून ठाकणेही नव्हे. क्रांती म्हणजे निराशेपोटी जन्मलेले एखादे तत्त्वज्ञान अथवा साहसवाद्यांचा संप्रदाय नव्हे. क्रांती ईश्वरविरोधी असू शकते, पण ती नक्कीच मनुष्य जातीच्या विरुद्ध नसते. ती एक ठोस आणि जिवंत शक्ती आहे, नवे आणि जुने-पुराणे, जीवन आणि साक्षात मृत्यू, प्रकाश आणि अंधार यातील आंतरिक द्वंद्व, निरंतर संघर्षाचा तो एक आविष्कार आहे, निव्वळ योगायोग नाही. अशी कोणतीही संगीताची सुरावट, कोणतीही एकतानता नाही, असा कोणताही ताल नाही जो क्रांतीविना निर्माण झाला आहे. संपूर्ण अवकाशातून जर निरंतर क्रांती नष्ट केली गेली, तर कवी ज्या ‘गोळ्यांच्या रागा’विषयी गात आले आहेत, तो खोटा, पोकळ होऊन जाईल. क्रांती नियम आहे, क्रांती हा एक आदर्श आहे आणि क्रांती हे सत्य आहे.*

*(एच.एस.आर.ए.चा जाहीरनामा)*

# मुळशी सत्याग्रह: टाटा उद्योगाविरोधात विस्थापनविरोधी संघर्षाची कहाणी

✎ शशांक

नरेंद्र मोदी गेल्या मे महिन्यात नवीन संसद इमारतीचे उद्घाटन करत असताना, त्यांच्या पक्षातील जनतेचे विविध शोषक नेते, त्यांचे पाय चाटणारे नोकरशहा आणि उद्योगजगतातील त्यांचे मालक कार्यक्रमात सामील झाले होते. यापैकी एक व्यक्ती, ज्यांच्या चेहऱ्यावरील स्मितहास्य आणि उत्साहाला पारा राहिला नव्हता, ते होते रतन टाटा. कदाचित ते 'न्यू इंडिया' मध्ये त्यांच्या उद्योगसमूहाला, अनेक पिढ्या चालत आल्याप्रमाणे विस्थापनाच्या, लुटण्याच्या, आणि शोषणाच्या नवनवीन संधींची कल्पना करून मनात खुश होत होते. अर्थात आपल्या पूर्वजांच्या काळापासून, म्हणजे अफूच्या व्यापाराच्या काळापासून, मिळत असलेल्या कायद्यापासूनच्या संपूर्ण संरक्षणाची मजा लुटत या सर्व संधींची कल्पना! किंवा कदाचित कोणीही जिची मागणी केली नव्हती अशा नवीन संसद भवनाच्या निर्मितीतून मिळालेल्या गडगंज नफ्यामुळे ते खुश असतील, कारण की ज्या बिल्डींगचे टेंडर 862 कोटी रुपयांना मिळाले, तिची किंमतही 1, 250 कोटीवर जाऊन पोहोचली होती (अर्थातच हा पैसा, जनतेच्या कराचाच पैसा होता!).

टाटांच्या तेव्हाच्या खुशीचे खरे कारण कदाचित आपल्याला माहित नसेल, परंतु जे आपल्याला नक्की माहित आहे तो आहे टाटांच्या "नैतिक" उद्योगसमुहाच्या प्रदीर्घ काळाचा काळवंडलेला इतिहास. या लेखात आपण अशा इतिहासातील एक महत्वाचा अध्याय असलेल्या, टाटा पावरने बांधलेल्या पुण्याजवळील मुळशी धरणाच्या विरोधात झालेल्या मुळशी सत्याग्रहाबद्दल जाणून घेऊयात, जो देशातील पहिला आणि कदाचित जगातील पहिला धरणविरोधी सत्याग्रह होता.

## मुळशी सत्याग्रहाबद्दल एक संक्षिप्त टीपण

ज्याच्या इतिहासाच्या अत्यंत कमी नोंदी सापडतात, असा मुळशी सत्याग्रह, पांडुरंग महादेव (सेनापती) बापट आणि वि. म. भुस्कुटे यांच्या नेतृत्वात 1920च्या दशकात लढला गेला. विजनिर्मितीसाठी टाटा हायड्रोलिक कंपनी (आताचे नाव टाटा पावर) निला व मुळा नदीवर धरण बांधू पहात होती, ज्यामुळे मुळशीतील 52 गावे पाण्याखाली जाणार होती. जनतेने ब्रिटीशांनी टाटांसोबत मिळून घेतललेल्या हुकूमशाही निर्णयाविरोधात संघर्षाचा निर्णय घेतला. एप्रिल 1921 मध्ये संघर्षाची सुरुवात झाली. सत्याग्रहींनी भूमिका घेतली की त्यांच्या मृतदेहांवरच धरण बांधले जाईल आणि धरणक्षेत्रात लोटांगण घालण्यापर्यंत आंदोलने केले. कामाला 7 महिने उशीर झाला, परंतु डिसेंबर 1921 मध्ये सत्याग्रह सुरू झाल्यानंतर ब्रिटिश सरकारने टाटांच्या हिताची जपणूक करण्यासाठी अनेक सत्याग्रहींना अटक केली आणि जबरदस्त शिक्षा केल्या. काही स्त्रोतांनुसार तर सत्याग्रहींच्या शरीरावर गरम पाणी सुद्धा ओतले गेले.

लढ्यात महिला मोठ्या संख्येने सामील झाल्या होत्या. राजेंद्र वोहरांनी लिहिलेल्या 'मुळशी सत्याग्रह' या पुस्तिकेत उल्लेख आहे की "24 एप्रिल रोजीच्या सार्वजनिक सभेत, मावळच्या महिलांनी निर्धार केला की त्या फक्त संघर्षाच्या पाठीशी राहणार नाहीत [...] जईभाई भोईने यांनी पुढाकार घेतला आणि इतर महिलांसोबत सत्याग्रहात सामीलही झाल्या. [...] पुढच्या दिवशी सुध्दा महिला सत्याग्रहात सामील झाल्या. [...] दोन दिवसांनंतर जईबाईंना अटक झाली. त्यांना तीन महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली. असे






असतानाही महिलांचा सहभाग सुरूच राहिला." तुरुंगात सत्याग्रहींचा छळ केला गेला. गांधींजींचे जवळचे सहकारी महादेवभाई देसाई यांनी डायरीत नोंद केली आहे की "येरवडा तुरुंगात कैद असलेल्या मुळशी सत्याग्रहींना चाबकाचे फटके मारल्याची अफवा खरी असल्याची कबुली सरकारच्या माहिई दिभागाने दिली आहे. परंतु, त्यांनी म्हटले की कैद्यांनी बंड केल्यामुळे चाबकाने मारण्यात आहे. बंड म्हणजे काय ते फक्त सुपरिटेंडंट यांनाच माहित असावे... जेल मध्ये काम करण्यास नकार देणे याला (खरोखर) बंड म्हटले जाऊ शकते, हे आश्चर्यकारक आहे!" (पान 28, खंड 17, वर्ष 1923).

आंदोलनाचे दमन केले गेले. परंतु मुळशी तालुक्यातील विस्थापितांच्या त्यानंतरच्या तिसऱ्या पिढीतील आजचे लोक अजूनही या ऐतिहासिक लढ्याची आठवण ठेवून आहेत. अंतिमत: काही नुकसानभरपाई दिली गेली, परंतु ती जमिनमालकांपर्यंतच पोहोचली आणि कुळं त्यापासून वंचितच राहिली.

मुळशीचा सत्याग्रह हा टाटा आणि ब्रिटिशांच्या युतीचे अजून एक उदाहरण आहे, ज्यांनी नफ्यासमोर "आपल्या" देशबांधवांच्या विरोधाची दडपशाही करण्यात मागेपुढे बघितले नाही.

## सद्यस्थिती

ब्रिटीश वा टाटांनी कोणतीही पर्यायी जमिन वा नुकसानभरपाई देऊ केली नाही. 52 गावांमधून विस्थापित केल्या गेलेल्या ग्रामस्थांना जमिनी सोडून जावे लागले, आणि नंतरच्या काळात त्यांनी अधिक उंचीवर नवीन गावे बसवली. पाण्याखाली गेलेल्या जमिनीला आता "टाटा जमिनी"च म्हटले जाते आणि या जमिनी परत मिळण्याची कोणतीही आशा ग्रामस्थांना राहिलेली नाही. काही जमिनींवर, जसे की बेटासारख्या असलेल्या सुसाला गावात, जिथे विस्थापितांचे वंशज राहतात, काही दशकांपूर्वी पर्यंत शेती करण्याच्या बदल्यात टाटा कंपनीला कर दिला जात होता. परंतु आता कंपनीने हा कर घेणे थांबवले आहे, जेणेकरून ग्रामस्थांशी कोणतेही करारात्मक नाते नाकारता यावे. अशाप्रकारे या नवीन पिढीच्या जिवीकेशी सुद्धा कंपनी खेळत आहे.

कंपनीच्या पाठिंब्याने टाटांचे अधिकारी सतत ग्रामस्थांना छळत असतात. तलावात मच्छिमारीला प्रतिबंध आहे. कंपनी जलसाठ्याभोवती 5 ते 6 फुट उंच भिंत सुद्धा बांधत आहे, आणि बराचसा भाग तर बांधून झाला आहे. या भिंतीमुळे स्थानिक गुरं आणि जंगली प्राण्यांना सुद्धा पाण्यापर्यंत जाणे अशक्य होत आहे. सरकारच्या पश्चिम घाट पर्यावरणशास्त्र समिती (वेस्टर्न घाट इकॉलॉजी पॅनेल) च्या दृष्टीने हा संपूर्ण प्रदेश पर्यावरणाच्या दृष्टिने संवेदनशील असला, तरी टाटांचा राज्यसत्तेमध्ये असलेला वट पाहता असे मानणे मूर्खपणाचे होईल की अशा प्रकल्पाचे कोणतेही गंभीर पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (एन्व्हिरोनमेंटल इंपॅक्ट असेसमेंट) केले जाईल.

धरणातील पाण्याचा वापर वीज निर्मितीसाठी केला जात असल्यामुळे कृष्णा खोऱ्यातील लोकांसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुद्धा अधिक बिकट बनला आहे. जमिनीची धूप, पाण्याचे स्त्रोत प्रभावित होणे, इतर कोणत्याही धरणाप्रमाणेच या धरणामुळे सुद्धा होत असलेल्या नदीखोऱ्यातील पर्यावरणीय व मानवी परिणामांची सुद्धा यादी मोठी आहे, ज्याची अर्थातच टाटा कंपनी जबाबदारी घेत नाही. आता कंपन्यांच्या नफ्याकरिता होत असलेल्या "राष्ट्र निर्मितीच्या" प्रक्रियेत कायदे, लोकांच्या जिवितावर होणारा परिणाम, विस्थापन हे सर्व दुय्यमच मानले गेले पाहिजे नाही का? एकच गोष्ट महत्वाची आहे, आणि ती म्हणजे नफ्याचा अमर्याद संचय.

आता जाणून घेऊ एक अत्यंत लबाड आणि चीड आणणारी गोष्ट. टाटा कंपनीनेच इथे सेनापती बापटांच्या स्मृतीमध्ये एक सिमेंटने बनवलेला फलक लावला आहे, तेच सेनापती बापट ज्यांना कंपनीने अनेक वर्षे तुरुंगवास भोगायला लावला, आणि ज्यांच्या सत्याग्रहाला चिरडून टाकले. इथपर्यंत की इथे बनलेल्या शाळेला सेनापती बापटांचे नाव देण्यात आले आहे आणि फलकावर त्यांच्या बरोबरीने जमशेदजी टाटांचा फोटो आहे, जे तेव्हा कंपनीचे प्रमुख होते. सर्वच शोषक अशा पद्धतीने इतिहासाचे पुनर्लेखन करत आले आहेत, आणि स्वत:ला पुण्यात्मे म्हणून प्रस्तुत करत आपला रक्तरंजित इतिहास लपवत आले आहेत.

देशातील उदारवाद्यांच्या मते अंबानी आणि अडानी "क्रोनी" (भ्रष्ट) भांडवलदार आहेत, जे मोदींच्या जवळचे आहेत, परंतु टाटा मात्र सर्वात स्वच्छ आहेत ज्यांच्याबद्दल एक शब्दही बोलू नये. यामुळेच टाटा ग्रुप जास्त धोकादायक ठरतो. कारण की ते त्यांचा काळा इतिहास लपवण्यात फार पटाईत आहेत. परंतु ते किंवा त्यांच्यासारखे कोणतेही "चांगले भांडवलदार" कायमस्वरूपी हा इतिहास दडवू शकत नाहीत. कॉर्पोरेट लुटीच्या विरोधातील जनतेच्या चळवळी त्याला समोर आणतच राहतील.

भारतात अनेक धरणविरोधी आणि विस्थापनविरोधी चळवळी स्वातंत्र्यानंतर झाल्या आहेत. हे समजणे गरजेचे आहे की धरणे स्वत:हूनच समस्या नाहीयेत, तर ज्या व्यवस्थेत ती बांधली जात आहेत, ती व्यवस्था मूळ समस्या आहे. भांडवलशाहीमध्ये कोणतेही उत्पादन हे मालकांच्या नफ्याकरता असते. त्यामुळे जलविद्युतसारखे स्वच्छ वीजनिर्मिती स्त्रोत सुद्धा पर्यावरणाचे आणि मानवी जीवनाचे नुकसान लक्षात न घेतल्यामुळे हानीकारक बनत जातात. एकमात्र चिंता राहते ती याची की, स्वस्तात (त्याकरिता काहीवेळी धोक्याची पर्वा न करता) वीज कशी बनवता येईल आणि वर्षभर विकून त्यातून नफा कसा कमावता येईल. यामुळेच धरणाच्या पाणलोट क्षेत्रात राहणाऱ्या लोकांचे विस्थापन, आणि कंपनीच्या मालकांच्या मर्जीवर ज्यांचे जीवन अवलंबित होऊन जाते अशा नदीच्या खालच्या खोऱ्यातील लोकांच्या जीवनावर होणारा परिणाम यांची पर्वा केली जात नाही. समाजवादाच्या अशा व्यवस्थेमध्ये जेथे उत्पादनाची साधने जनतेची असतील आणि जिथे उत्पादनाचे निर्णय नियोजित व लोकशाही पद्धतीने घेतले जातील, आपण जलविद्युत सारख्या नूतनीकरणयोग्य उर्जास्त्रोताच्या योग्य वापराची अपेक्षा करू शकतो.

# क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 7

## मूल्याच्या श्रम सिद्धांताचा विकास: ॲडम स्मिथ, डेव्हिड रिकार्डो आणि मार्क्स - 2 (डेव्हिड रिकार्डो)

✎ अभिनव

आतापर्यंत आपण अभिजात राजकीय अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ यांचे महत्त्वाचे योगदान आणि त्यांच्या कमतरता पाहिल्या आहेत. आपण बघितले ॲडम स्मिथ यांनी मूल्याचा श्रम सिद्धांत दिला आणि सांगितले की प्रत्येक मालाचे मूल्य त्यात लागलेल्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष श्रमांच्या प्रमाणाद्वारे ठरते. दुसऱ्या शब्दांत, प्रत्येक मालाचे मूल्य त्यामध्ये लागलेल्या उत्पादनाच्या साधनांच्या उत्पादनात खर्च झालेल्या श्रमांच्या प्रमाणाद्वारे आणि त्या वस्तूच्या उत्पादनात प्रत्यक्षपणे लागलेल्या श्रमांच्या प्रमाणाद्वारे ठरते. ॲडम स्मिथचे योग्य उत्तराधिकारी डेव्हिड रिकार्डो यांनी या शोधाची गणना राजकीय अर्थशास्त्राच्या सर्वात महत्त्वाच्या सिद्धांतांमध्ये केली. परंतु ॲडम स्मिथ आपला सिद्धांत केवळ साधारण माल उत्पादनालाच सुसंगतपणे लागू करू शकले, म्हणजे माल उत्पादनाचा तो काळ जेव्हा उत्पादनाच्या साधनांचा मालक स्वतः प्रत्यक्ष उत्पादकच आहे; म्हणजेच जोपर्यंत भांडवली माल उत्पादनाचे युग सुरू झालेले नव्हते.

भांडवली माल उत्पादनामध्ये उत्पादनाच्या साधनांचा मालक भांडवलदार बनतो (ज्यामागे बळजबरी आणि हिंसाचाराची ऐतिहासिक प्रक्रिया होती, जिला आदिम भांडवल संचय म्हणून ओळखले जाते) आणि प्रत्यक्ष उत्पादकाकडून उत्पादनाची साधने काढून घेतली जातात व तो आपली श्रमशक्ती विकण्यास बाध्य असलेला एक वेतनी कामगार बनतो. पूर्वी प्रत्यक्ष उत्पादकाच्या श्रमातून निर्माण होणारे नवीन मूल्य संपूर्णपणे प्रत्यक्ष उत्पादकाकडे जात असे. तोपर्यंत ॲडम स्मिथला सापेक्ष किंमत किंवा विनिमय मूल्य ठरवण्यात कोणतीही अडचण किंवा अडथळा नव्हता. परंतु आता हे नवीन मूल्य दोन भागांमध्ये विभागले जाते: मजुरी आणि नफा. अशा स्थितीत ॲडम स्मिथसमोर दोन समस्या उभ्या राहिल्या: पहिली, कामगार आणि भांडवलदार यांच्यातील देवाणघेवाण विनिमयाच्या समानतेच्या तत्त्वाद्वारे स्पष्ट करणे स्मिथला कठीण झाले. कारण कामगाराच्या प्रत्यक्ष श्रमाने जे नवे मूल्य निर्माण होत होते ते संपूर्णपणे कामगाराला मिळत नव्हते, तर त्याचा काही भाग नफ्याच्या स्वरूपात भांडवलदाराकडे जात होता आणि त्यामुळे कामगार व भांडवलदार यांच्यातील विनिमयाला विनिमयाच्या समतुल्यतेच्या तत्त्वाद्वारे समजावले जाऊ शकत नव्हते. दुसरी म्हणजे, जर प्रत्येक भांडवलदार उत्पादकाच्या उद्योगामध्ये नवीन उत्पादित मूल्य हे मजुरी व नफा यांच्यात समान प्रमाणात विभागले जात नसेल आणि जर भांडवल व श्रम यांचे गुणोत्तर प्रत्येक उद्योगात सारखे नसेल, तर मग मालाचे मूल्य आणि मालाची किंमत यामध्ये फरक निर्माण होईल आणि स्मिथ ह्या फरकाला त्यांच्या मूल्याच्या श्रम सिद्धांताद्वारे स्पष्ट करू शकत नाही. आपण एका उदाहरणाने हे समजून घेऊ.

स्मिथ हे सत्य जाणतात की साधारण माल उत्पादनाच्या काळातही वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये प्रति तास श्रमावर मिळणारे उत्पन्न संतुलित होत राहते कारण जर पहिल्या क्षेत्रात एका तासाच्या श्रमावर साधारण माल उत्पादकाला 10 रुपये मिळत असतील आणि दुसऱ्या क्षेत्रामध्ये एका तासाच्या श्रमासाठी साधारण माल उत्पादकाला 12 रुपये मिळत असतील तर मग पहिल्या क्षेत्रातील काही उत्पादक दुसऱ्या क्षेत्रातील आणि या प्रक्रियेमुळे दुसऱ्या क्षेत्रातील मागणी आणि पुरवठ्याच्या समीकरणात बदल झाल्यामुळे, मालाच्या किमतीत काही प्रमाणात घट होईल आणि प्रति तास श्रमावर मिळणारे उत्पन्नही घसरेल. ही प्रक्रिया दोन्ही क्षेत्रांतील प्रति तास श्रमावर मिळणाऱ्या उत्पन्नाचे संतुलन होईपर्यंत सुरू राहील. स्मिथच्या मते ही प्रक्रिया संपूर्ण अर्थव्यवस्थेत चालू असते असते, व त्यात स्पर्धा अस्तित्वात असते.

त्यामुळे, साधारण माल उत्पादनाच्या प्रत्येक क्षेत्रातील वस्तूंची सापेक्ष किंमत किंवा विनिमय मूल्य तिच्यामध्ये लागलेल्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष श्रमांच्या प्रमाणात ठरेल. स्मिथच्या उदाहरणाच्याच आधारे आपण खाली तक्ता-1 मध्ये दिलेल्या उदाहरणावरून हे समजून घेऊ:

जोपर्यंत प्रत्यक्ष उत्पादकच उत्पादनाच्या साधनांचा मालक आहे (ज्याला तो उत्पादनाच्या साधनांचे उत्पादन करणाऱ्या माल उत्पादकाकडूनच वरील नियमांद्वारे ठरणाऱ्या सापेक्ष किमतीला खरेदी करतो) तोपर्यंत मालाचे मूल्य श्रमाच्या प्रमाणाद्वारे ठरवण्यात स्मिथचा मूल्याचा श्रम सिद्धांत पूर्णपणे सक्षम दर्शविल्याप्रमाणे असेल:

पहिल्या भांडवलदारासाठी नफ्याचा दर = नफा / एकूण गुंतवणूक x 100

= (100 / 200) x 100

= 50 टक्के

दुसऱ्या भांडवलदारासाठी नफ्याचा दर = नफा / एकूण गुंतवणूक x 100

= (150 / 350) x 100

= 43.16 टक्के

येथे नवीन मूल्य दोन्ही भांडवलदारांच्या बाबतीत नफा आणि मजुरी यांच्यात समान प्रमाणात विभागले जात असले तरी दोन्ही भांडवलदारांसाठी नफ्याचा दर भिन्न आहे. याचे कारण असे की अतिरिक्त मूल्याचा दर (म्हणजे वैयक्तिक भांडवलदारासाठी नफा आणि मजुरी यांचे गुणोत्तर) समान असला तरी उत्पादनाच्या साधनांवरील गुंतवणूक आणि मजुरीवर झालेली गुंतवणूक यांचे गुणोत्तर, म्हणजे भांडवल आणि श्रम यांचे गुणोत्तर वेगवेगळे आहे आणि नफ्याचा दर हा नफा व एकूण भांडवल गुंतवणूक यांचे गुणोत्तर असते. अशा अशी असेल: 'उत्पादनाच्या साधनांची किंमत + मजुरी + सरासरी नफा'.

परंतु अशावेळी प्रत्येक मालाची सापेक्ष किंमत त्याच्या श्रममूल्यापासून वेगळी होईल. ॲडम स्मिथचा श्रम सिद्धांत या परिघटनेचे स्पष्टीकरण देऊ शकत नाही. जेव्हा ॲडम स्मिथ या परिघटनेचे स्पष्टीकरण देऊ शकत नाही, तेव्हा तो त्याच्या मूल्याच्या श्रम सिद्धांताचाच त्याग करतो आणि मूल्याच्या उत्पादन-खर्च सिद्धांताकडे येतो, ज्याचा आम्ही आधीसुद्धा उल्लेख केला आहे. या सिद्धांतानुसार मजुरीचा एक नैसर्गिक दर असतो आणि नफ्याचाही एक नैसर्गिक दर असतो. या दरांनुसार स्मिथ मजुरी आणि नफा मोजतो आणि उत्पादनाच्या साधनांमधील गुंतवणुकीत त्याला जोडून मालाची किंमत काढतो आणि अशा प्रकारे मालाची सापेक्ष किंमत त्यामध्ये लागलेल्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष श्रमांच्या प्रमाणावरून करण्याच्या स्वतःच्याच सिद्धांताचा त्याग करतो. परंतु आपण सर्व हे जाणतो की मजुरी आणि नफ्याचे असे नैसर्गिक दर गृहीत धरणे म्हणजे वास्तवात ती गोष्ट गृहीत धरण्यासारखे

**तक्ता-1**

| | प्रति तास श्रमातून मिळणारे उत्पन्न | उत्पादनात लागलेले अप्रत्यक्ष श्रम | उत्पादनात लागलेले प्रत्यक्ष श्रम | मालाचे मूल्य |
|---|---|---|---|---|
| उत्पादक 'क' | रु. 10 प्रति तास | 5 तास = रु. 50 | 10 तास = रु. 100 | रु. 150 |
| उत्पादक 'ख' | रु. 10 प्रति तास | 10 तास = रु. 100 | 20 तास = रु. 200 | रु. 300 |

आहे. पण आता आपण अशा परिस्थितीची कल्पना करतो आहोत ज्यात भांडवली माल उत्पादन सुरू झालेले आहे, प्रत्यक्ष उत्पादकाला उत्पादनाच्या साधनांपासून वंचित केले गेले आहे आणि तो आपली श्रमशक्ती विकणारा वेतनी मजूर बनला आहे आणि भांडवलदाराकडे उत्पादनाच्या साधनांची मालकी आली आहे. आता उत्पादनाच्या साधनांची किंमत तर पूर्वीप्रमाणेच मालाच्या मूल्यात हस्तांतरित केली जाते, परंतु आता प्रत्यक्ष श्रमाच्या प्रत्येक तासापासून मिळणारे उत्पन्न किंवा त्यातून निर्माण होणारे मूल्य भांडवलदार आणि मजुरी कामगार यांच्यामध्ये नफा आणि मजुरीच्या स्वरूपात विभागले जाते. साहजिकच, संपूर्ण अर्थव्यवस्थेत वेगवेगळ्या भांडवली माल उत्पादकांकडून उत्पादनाच्या साधनांवर होणारा खर्च आणि श्रमशक्तीच्या खरेदीवर होणारा खर्च सारख्या प्रमाणात नसतो. अशा परिस्थितीत हा मुद्दा सखोलपणे समजून घेण्यासाठी आणखी एक उदाहरण पाहू या. स्मिथप्रमाणे आपण असे गृहीत धरू की प्रत्यक्ष श्रमाने उत्पादित केलेले मूल्य दोन्ही भांडवलदारांच्या ('क' व 'ख') स्थितीत दोन्ही भांडवलदारांसाठी अतिरिक्त मूल्याचा दर सारखा असला तरी नफ्याचा दर वेगवेगळा असेल. पण जर दोन क्षेत्रांमध्ये भांडवलदारांच्या नफ्याच्या दरात तफावत असेल, तर भांडवलशाही अर्थव्यवस्थेत ही परिस्थिती कायम राहू शकते का? नाही. अशा परिस्थितीत स्पर्धेमुळे भांडवलाचा ओघ कमी नफ्याचा दर असलेल्या क्षेत्रातून जास्त नफ्याचा दर असलेल्या क्षेत्राकडे जाईल, ज्यामुळे जास्त नफ्याचा दर असलेल्या क्षेत्रातील पुरवठा वाढेल आणि किंमत कमी होईल, तसेच कमी नफ्याचा दर असणाऱ्या क्षेत्रातील पुरवठा कमी होईल आणि किमती वाढतील. या प्रक्रियेत दोन्ही क्षेत्रातील नफ्याचा दर संतुलित होणे हे एका प्रक्रियेच्या स्वरूपात घडेल. प्रत्येक भांडवलदार किमान अर्थव्यवस्थेचा सरासरी नफ्याचा दर प्राप्त केल्यानंतरच समाधानी होईल. हा सरासरी नफ्याचा दर काय आहे?

वरील उदाहरणात, अर्थव्यवस्थेचा सरासरी नफ्याचा दर = एकूण नफा/एकूण गुंतवणूक

= (250/550) x 100

= 45.45 टक्के

आहे जिल समजावण्याचीची अपेक्षा राजकीय अर्थशास्त्राकडून केली गेली आहे. याचे कारण हे आहे की स्मिथ ना कामगार आणि भांडवलदार यांच्यातील देवाणघेवाण समजू शकतात, ना ते भांडवली माल उत्पादनात होणाऱ्या स्पर्धेमुळे निर्माण होणाऱ्या उत्पादनाच्या किमतींना (prices of production) सुसंगतपणे समजून घेऊ शकतात. परिणामी, विरोधाभासांनी वेढले जाऊन ते त्यांच्या मूल्याच्या वैज्ञानिक श्रम सिद्धांताचाच त्याग करतात. ते मूल्याच्या श्रम सिद्धांताच्या रक्षणासाठी फक्त दोन अटी घालतात, ज्या कोणत्याही भांडवली अर्थव्यवस्थेत कधीच पूर्ण होत नाहीत आणि कधीही पूर्ण होऊ शकत नाहीत: पहिली अट, प्रत्येक उद्योगातील नवीन मूल्य मजुरी आणि नफा यांच्यात समान प्रमाणात विभागले जावे आणि दुसरी अट अशी की प्रत्येक उद्योगात भांडवल आणि श्रम यांचे गुणोत्तर समान असावे. जर या दोन अटींची पूर्तता झाली नाही तर स्मिथ मूल्याच्या उत्पादन-खर्च सिद्धांताकडे वळतात.

रिकार्डोने स्मिथची ही अडचण सोडवतात.

**तक्ता-2**

| | उत्पादनाच्या साधनांवर झालेली भांडवल गुंतवणूक किंवा त्यांच्या उत्पादनात लागलेले श्रमाचे प्रमाण/ अप्रत्यक्ष श्रम | मालाच्या उत्पादनात लागलेले प्रत्यक्ष श्रम | मजुरी | नफा | सापेक्ष किंमत (प्रत्यक्ष श्रम आणि अप्रत्यक्ष श्रम यांची बेरीज) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवलदार 'क' | 10 तास = रु. 100 | 20 तास = रु. 200 | रु. 100 | रु. 100 | रु. 300 |
| भांडवलदार 'ख' | 20 तास = रु. 200 | 30 तास = रु. 300 | रु. 150 | रु. 150 | रु. 500 |

बाबतीत समान प्रमाणात विभागले गेले आहे. आपण असे देखील गृहीत धरू की उत्पादनाच्या एका चक्रात उत्पादनाची साधने पूर्णपणे वापरली जातात. अशा वेळी परिस्थिती तक्ता-2 मध्ये

जर प्रत्येक भांडवलदाराला मिळणारा नफा एका सतत चालणाऱ्या प्रक्रियेच्या स्वरूपात आणि एक प्रवृत्ती म्हणून सरासरी नफ्याच्या जवळ पोहोचला, तर त्याच्या मालाची किंमत

रिकार्डो म्हणतो ती पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे भांडवली माल उत्पादन मूल्याच्या श्रम सिद्धांताला नाकारत नाही तर त्याला समृद्ध करते. भांडवली

पान 9 वर

# क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 7

पान 8 वरून

माल उत्पादनाच्या परिस्थितीतही मूल्याचा श्रम सिद्धांत खरा आहे आणि तोच वस्तूंच्या सापेक्ष किमतींचे अचूक स्पष्टीकरण देऊ शकतो. हे सिद्ध करण्यासाठी प्रथम रिकार्डो स्मिथचेच उदाहरण घेतो आणि सांगतो की आपण माल उत्पादनाच्या एका 'आदिम स्थिती'ची कल्पना करत आहोत जी आपण वरील तक्ता-1 मध्ये दर्शविली आहे. त्यानंतर रिकार्डो त्यात भांडवली माल उत्पादनाची एक अशी परिस्थिती जोडतो जिच्यात स्मिथने नमूद केलेल्या दोन्ही अटी, म्हणजे नवीन मूल्याचे नफा आणि मजुरी यांमध्ये समान प्रमाणात विभागले जाणे आणि सर्व भांडवली उद्योगांमध्ये भांडवल आणि श्रम यांचे समान गुणोत्तर असणे, पूर्ण होत आहेत. ती परिस्थिती कशी असेल? खाली दिलेल्या तक्ता-3 वरून समजून घेऊयात:

तक्ता-3

| | अप्रत्यक्ष श्रम किंवा उत्पादनाच्या साधनांवर लागलेले श्रम | प्रति तास श्रमावर मिळणारे उत्पन्न | मजुरी / तास | नफा/ तास | गुंतवलेल्या भांडवलाचा खर्च/तास | | प्रति तास निर्मित मालाचे श्रम मूल्य | मालाची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भांडवलदार 'क' | 20 तास | रु. 10 | रु. 4 | रु. 6 | रु. 60 | 10 टक्के | रु. 66 | रु. 66 |
| भांडवलदार 'ख' | 10 तास | रु. 10 | रु. 4 | रु. 6 | रु. 60 | 10 टक्के | रु. 66 | रु. 66 |

आपण वरील उदाहरणात पाहू शकतो, त्याप्रमाणे आता एका तासाचे श्रम जे 10 रुपये उत्पन्न देते, ते नफा आणि मजुरीत विभागले जात आहे. आता एका तासाच्या श्रमासाठी मजुराला रु. 4 मजुरी मिळत आहे, तर उर्वरित रु. 6 नफ्याच्या स्वरूपात भांडवलदारांकडे जात आहेत. तसेच एका तासात दोन्ही भांडवलदारांच्या उद्योगांमध्ये रु. 60 च्या बरोबरीची उत्पादन साधन खर्च होतात.

तक्ता-4

| | अप्रत्यक्ष श्रम किंवा उत्पादनाच्या साधनांवर लागलेले श्रम | प्रति तास श्रमावर मिळणारे उत्पन्न | मजुरी/ तास | नफा/ तास | गुंतवलेल्या भांडवलाचा खर्च/तास | नफ्याचा दर | प्रति तास तयार मालाचे श्रम मूल्य | मालाची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भांडवलदार 'क' | 20 तास | रु. 7 | रु. 4 | रु. 3 | रु. 30 | 10 टक्के | रु. 36 | रु. 33 |
| भांडवलदार 'ख' | 10 तास | रु. 13 | रु. 4 | रु. 9 | रु. 90 | 10 टक्के | रु. 96 | रु. 99 |

म्हणजेच प्रति तास उत्पादित वस्तूंचे मूल्य आहे: 'प्रति तास भांडवल खर्च + प्रति तास नफा' जे वरील दोन्ही भांडवलदारांच्या बाबतीत रु. 60 + रु. 6, म्हणजेच रु. 66 आहे. लक्षात ठेवा की गुंतवलेल्या भांडवलात मजुरी समाविष्ट आहे, जी भांडवलदार त्याच्या भांडवलाच्या काही भागातून कामगारांना देतो. नफ्याचा दर आहे: प्रति तास नफा/प्रति तास भांडवल खर्च. या उदाहरणात नफ्याचा दर = रु. 6/रु. 60 म्हणजे 10 टक्के. म्हणजेच, दोन्ही भांडवलदारांच्या उद्योगांमध्ये भांडवल-श्रम यांचे गुणोत्तर समान आहे आणि नवीन मूल्याचे नफा आणि मजुरी यांच्यातील विभागणीचे गुणोत्तर समान आहे. त्यामुळे दोघांसाठीही मूल्य आणि किमतीत फरक नाही.

आता आणखी एक उदाहरण घेऊ. येथे भांडवल आणि श्रम यांचे गुणोत्तर वेगळे आहे. परंतु आपल्याला असे गृहीत धरून चालावे लागेल की नफ्याचा दर दोघांसाठीही सारखाच आहे, कारण जर तो असमान असेल तर भांडवलाचा प्रवाह कमी नफ्याचा दर असलेल्या क्षेत्रातून जास्त नफ्याचा दर असलेल्या क्षेत्राकडे तोपर्यंत होत राहील जोपर्यंत एका प्रक्रियेच्या स्वरूपात नफ्याच्या दराचे संतुलन होणार नाही. साहजिकच, रिकार्डोला देखील हे माहीत होते की प्रत्यक्षात सर्व भांडवलदारांना कोणत्याही क्षणी सरासरी नफा मिळत नाही आणि नफ्याचे सरासरीकरण एका सतत चालणाऱ्या प्रक्रियेच्या स्वरूपातच सुरूच राहते. परंतु या आर्थिक गतीला समजण्यासाठी आणि मूल्य व किमतीतील तफावतीची परिघटना समजून घेण्यासाठी आपल्याला दोन्ही भांडवलदारांसाठी श्रम आणि भांडवल यांचे गुणोत्तर वेगळे परंतु नफ्याचा दर जवळजवळ सारखाच आहे असे मानावे लागेल आणि हाच कुठल्याही परिघटनेला समजून घेण्याचा वैज्ञानिक मार्ग असतो. चला, या परिस्थितीत काय होईल ते पाहूया.

खाली दिलेला तक्ता-4 समजून घेण्याची युक्ती अशी आहे की तुम्ही प्रथम तो सातव्या स्तंभापासून पहिल्या स्तंभापर्यंत वाचा, कारण सर्वप्रथम आपल्याला दोन्ही भांडवलदारांसाठी नफ्याचा दर समान आहे असे गृहीत धरावे लागेल. आणि नंतर तक्ता-4 पुन्हा पहिल्या स्तंभापासून नवव्या स्तंभापर्यंत वाचा.

येथे आपण पाहू शकतो की दोन्ही भांडवलदारांच्या उद्योगांमध्ये श्रम आणि भांडवल यांचे गुणोत्तर समान नाही कारण एका तासाच्या श्रमात, पहिल्या भांडवलदाराच्या उद्योगाला भांडवल खर्च 30 रुपये आहे, तर दुसऱ्या भांडवलदाराच्या उद्योगाला हा खर्च रु. 90 आहे. परंतु स्पर्धेमुळे नफ्याचे सरासरीकरण होते आणि त्यामुळे नफ्याचा दर दोघांसाठी समान मानला गेला आहे. अशा स्थितीत पहिल्या भांडवलदाराच्या उद्योगात प्रति तास 3 रु. नफा मिळत आहे कारण प्रति तास भांडवल खर्च रु. 30 आहे आणि नफ्याचा दर 10 टक्के आहे. दुसऱ्या भांडवलदाराच्या उद्योगात प्रति तास 9 रु. नफा मिळत आहे कारण प्रति तास भांडवल खर्च रु. 90 आहे आणि त्यासाठीदेखील नफ्याचा दर 10 टक्के आहे. प्रति तास उत्पादित होणाऱ्या मालाचे मूल्य 1 तासात प्रत्यक्ष श्रमाने निर्माण केलेल्या नवीन मूल्याच्या आणि 1 तासात उत्पादनाच्या साधनांवर झालेल्या खर्चाच्या बरोबरीचे असल्याने (जे येथे एकूण भांडवल खर्च आणि दिलेली मजुरी यातील फरकाएवढे आहे, म्हणजे रु. 26) पहिल्या भांडवलदारासाठी दर तासाला उत्पादित मालाचे मूल्य आहे रु. 10 + रु. 26 = रु. 36 आणि त्याच्यासाठी किंमत आहे रु. 3 (सरासरी नफा) + रु. 30 (एकूण भांडवल खर्च). त्याचप्रमाणे दुसऱ्या भांडवलदारासाठी मूल्य निर्मिती/तास आहे रु. 96 आणि किंमत आहे रु. 99. दोन्ही भांडवलदारांच्या उद्योगांमध्ये जिवंत/प्रत्यक्ष श्रमाने प्रति तास निर्माण होणारे मूल्य रु. 10 च आहे कारण एका तासाचे श्रम रु. 10 चेच मूल्य निर्माण करत आहे. दोन्ही उद्योगांमध्ये प्रत्यक्ष श्रमाने प्रति तास तेवढेच एकूण नवीन मूल्य (रु. 20) तयार होत आहे जेवढे पूर्वी म्हणजे तक्ता-3 मध्ये होत होते. दोन्ही उद्योगांमध्ये एकूण नफा सुद्धा अजूनही तेवढाच आहे (एकूण रु. 12) जेवढा पूर्वी म्हणजे तक्ता 3 मध्ये होता. परंतु हे नवीन मूल्य आणि नफा आता दोन भांडवलदारांमध्ये वेगळ्या पद्धतीने पुनर्वितरित होत आहे. कारण भांडवल आणि श्रम यांच्यातील गुणोत्तर दोन्ही उद्योगांमध्ये भिन्न आहे आणि त्यामुळे दोन्हीमध्ये नफ्याचा दर भिन्न आहे, परंतु प्रत्येक भांडवलदार त्याच्या भांडवलाच्या आकारानुसार किमान सरासरी नफा मिळवण्याची अपेक्षा ठेवतो आणि जेव्हा असे होत नाही तेव्हा भांडवलाचा प्रवाह कमी नफ्याचा दर असलेल्या क्षेत्रांतून जास्त नफ्याचा दर असलेल्या क्षेत्रांकडे जातो, त्यामुळे एक प्रवृत्ती म्हणून नफ्याचा सरासरी दर सृजित होतो.

रिकार्डोचे योगदान हे होते की त्याने सांगितले की मालाचे मूल्य आणि मालाची किंमत यामध्ये निर्माण होणारा फरक कधीही 7 टक्क्यांपेक्षा जास्त असू शकत नाही. याला 'रिकार्डोचा 7 टक्के नियम' असेही म्हणतात. हा फरक 7 टक्क्यांपेक्षा जास्त होताच एक उलटी प्रक्रिया सुरू होते जी मूल्य आणि किंमत यांच्यातील फरक विरुद्ध दिशेने वळवते. म्हणून रिकार्डो म्हणतो की जर एक प्रक्रिया म्हणून पाहिले तर किमतींसाठी श्रमाच्या प्रमाणात निर्माण झालेले मूल्य गुरुत्व केंद्र किंवा गुरुत्वाकर्षण म्हणून कार्य करते आणि किमती श्रम-मूल्याच्या याच गुरुत्व केंद्राभोवती फिरत राहतात. म्हणूनच जर आपण साधारण माल उत्पादनाऐवजी भांडवली माल उत्पादनाचे जरी विश्लेषण केले, तरी ते मूल्याच्या श्रम सिद्धांताला निष्फळ करत नाही तर त्याला समृद्ध करते किंवा त्यात एक बदल घडवून आणते. अजूनही वस्तूंची सापेक्ष किंमत या 7 टक्क्यांच्या कमाल फरकासह त्यांच्या श्रम मूल्याच्या गुरुत्व केंद्राभोवतीच फिरते आणि त्यांना स्पष्ट करण्यासाठी आपल्याला वस्तूंच्या सापेक्ष किंमतींच्या उत्पादन-खर्च सिद्धांताकडे जाण्याची आवश्यकता नाही, जसे की स्मिथने केले होते आणि जो त्याच्या सिद्धांताचा तो हिस्सा आहे ज्याला मार्क्सने अवैज्ञानिक म्हटले आहे.

अशाप्रकारे रिकार्डो स्मिथच्या एक पाऊल पुढे जातात आणि ॲडम स्मिथच्या श्रम सिद्धांताला ॲडम स्मिथच्या स्वतःच्या विरोधाभासांपासून वाचवतात आणि दाखवतात की तो भांडवली माल उत्पादनाच्या युगातही कोणत्याही अटींशिवाय पूर्णपणे वैध आहे. नंतर अनुभवांच्या अभ्यासाने हे बरोबर सिद्ध केले की भांडवली माल उत्पादन, भांडवलदार, खाजगी मालकी आणि नफ्याच्या श्रेणी अस्तित्वात आल्याने मूल्याच्या श्रम सिद्धांताचा त्याग करण्याची गरज नाही, फक्त त्यात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. भांडवली माल उत्पादन मूल्याचा श्रम सिद्धांत निष्फळ करत नाही, उलट सुधारित स्वरूपात त्याला अधिक मजबूत करते.

परंतु स्मिथप्रमाणेच रिकार्डोसुद्धा हे समजू शकले नाहीत की भांडवलशाही समाजात भांडवलदार वर्गाच्या नफ्याचे मूळ यात आहे की कामगाराची श्रमशक्ती ही स्वतः माल बनते. भांडवलदार आणि कामगार यांच्यातील विनिमय हा श्रम आणि मजुरीचा नसून श्रमशक्ती आणि मजुरीचा असतो आणि ही श्रमशक्ती अशी एक विशिष्ट माल आहे जी तिच्या उत्पादक उपभोगाच्या प्रक्रियेत तिच्या मूल्यापेक्षा जास्त मूल्य निर्माण करण्यास सक्षम आहे. त्यामुळे अतिरिक्त मूल्याच्या सिद्धांतापर्यंत स्मिथ आणि रिकार्डो किंवा मार्क्स यांच्यापूर्वीचा कोणताही राजकीय अर्थशास्त्रज्ञ पोहोचू शकला नाही. तसेच मार्क्सपूर्वीचे अभिजात राजकीय अर्थशास्त्र मूर्त आणि अमूर्त श्रम यांमधील फरक आणि मजुरीवर लागणारे परिवर्तनशील भांडवल (variable capital) आणि एकदाच मालामध्ये आपले मूल्य हस्तांतरित करणारे उत्पादनाच्या घटकांवर लागणारे चल भांडवल (circulating capital) यांच्यातील फरकालासुद्धा स्पष्टपणे समजू शकले नव्हते. याशिवाय स्मिथ आणि रिकार्डो यांनी जमिनीचे भाडे, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि चलन याबाबत जे सिद्धांत दिले आहेत ते अपूर्ण, सदोष आणि अनेक भ्रमांनी ग्रस्त आहेत, ज्यांची आलोचना करत मार्क्सने जमीन भाडे, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि चलन याबाबत वैज्ञानिक सिद्धांत मांडले. परंतु त्यावर आपण भविष्यातील अध्यायांमध्ये विचार करू. आता आमचे उद्दिष्ट केवळ थोडक्यात हे दाखवणे होते की मार्क्सच्या आधी अभिजात राजकीय अर्थशास्त्राने मूल्याचा श्रम सिद्धांत कसा विकसित केला आणि मार्क्सने त्यातील उणिवा दूर करून अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत कसा विकसित केला, भांडवली समाजात कामगार वर्गाच्या शोषणाला संपूर्णतेत आणि वैज्ञानिकरित्या कसे समजले.

(मूळ लेख- मजदूर बिगुल, डिसेंबर 2022;
मराठी अनुवाद- जयवर्धन)

# थॉमस संकारा : आफ्रिकन क्रांतिकारी

पान 11 वरून

टिकवून ठेवू शकतो. त्याने आंतरराष्ट्रीय मुद्रा कोशाकडून (IMF) मदत पॅकेजेस नाकारले. त्याला ठाऊक होते की त्या मदतीसोबत अनेक अटी सुद्धा जोडल्या गेल्या आहेत. त्याचे प्रसिद्ध घोषणा आहे, "जो तुम्हाला खायला देतो तो त्याच्या इच्छा तुमच्यावर लादतो." जुलै 1987 मध्ये ऑर्गनायझेशन ऑफ आफ्रिकन युनिटीच्या परिषदेत, त्याने इतर आफ्रिकन देशांना राजी करण्याचा प्रयत्न केला की आपण एकत्रितपणे आपल्या पूर्वीच्या वसाहतींना त्यांचे आर्थिक कर्ज देण्यास नकार देऊयात. त्याने सांगितले की कर्जाची उत्पत्ती वसाहतवादाच्या उत्पत्तीकडे जाते आणि ज्या कर्जासाठी आपण जबाबदार नाही ते आपण का फेडावे. उलट इतरांवर आपले असे काही देणे आहे की ज्याची किंमत ते पैशात फेडू शकत नाहीत, म्हणजेच आपल्यावर केलेल्या अन्याय अत्याचाराची, देशाच्या केलेल्या लुटीची आणि आपल्या सांडलेल्या रक्ताची.

संकाराने संपूर्ण आफ्रिकेतील साम्राज्यवादी राजवटीला हादरून सोडले होते. त्याच्या धोरणांमुळे बुर्कीना फासोतील भांडवलदार वर्गाचा एक हिस्साही नाखूष होता. त्याचे क्रांतिकारी विचार आणि कामांमुळे आफ्रिकेतील इतर देश प्रभावित होण्याची दाट शक्यता होती म्हणूनच, फ्रान्सने संकराचा माजी साथी ब्लेझ कंपाओरे यांचा वापर करून त्याच्या हत्येला पाठिंबा दिला आणि अमेरिकेने सुद्धा याचे समर्थन केले. 15 ऑक्टोबर 1987 रोजी कंपाओरेने संकाराची हत्या केली आणि स्वत: बुर्कीना फासोचा अध्यक्ष झाला. कंपाओरेच्या सरकारने आणि बुर्कीना फासोत संकराने सुरु केलेली सारी धोरणे उलटून लावली, नैसर्गिक साधनसंपत्तीचे खाजगीकरण पुन्हा सुरू करण्यात आले आणि देश पुन्हा नग्न भांडवलशाहीच्या वाटेवर चालू लागला.

### बुर्कीना फासो: फ्रेंच प्रभावाकडून रशियन साम्राज्यवादी प्रभावाकडे

बुर्कीना फासो हा आफ्रिकेतील सोन्याच्या खाणी असणारा चौथ्या क्रमांकाचा देश आहे, तसेच देशात विविध खनिज संपदा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे तरीही जवळपास 40 टक्के लोकसंख्या राष्ट्रीय गरिबी रेषेखाली जगत आहे. संकाराच्या सुधारांना मागे वळवल्याच्या परिणामी आजही देशातील 42 टक्के किशोरवयीन मुली शाळाबाह्य आहेत, आजही फक्त 14 टक्के लोकसंख्येला वीज उपलब्ध आहे. संसाधनांसाठी कराव्या लागणाऱ्या कठोर संघर्षामुळे देशात अनेक अतिरेकी गट नियंत्रण मिळवू लागले, सरकारच्या ताब्यात फक्त 60 टक्के जमीन उरली आहे. 2022 मध्ये, शेजारच्या माली देशापासून येणाऱ्या जिहादी बंडखोरांच्या हल्ल्यात आजपर्यंत किमान 10,000 लोक मारले गेले आहेत आणि 20 लाखांहून अधिक लोक विस्थापित झाले आहेत.

देशात मागील आठ महिन्यात दोन वेळा सत्ता पालट झाला ज्यात इब्राहिम तरोरे या लष्करी अधिकाऱ्याने याने सैन्यात बंड करून दुसऱ्यांदा लष्करी सैन्य स्थापन केले आहे तो सध्या बुर्कीना फासोचा राष्ट्रपती आहे. 2023 मध्ये त्याने फ्रेंच सैन्याची हकालपट्टी करून फ्रांस कडून मिळणारी आर्थिक मदत थांबवली आहे. हल्लीच दिलेल्या मुलाखतीत त्याने म्हटले आहे की रशिया त्यांचा चांगला मित्र आहे आणि सतत शस्त्र पुरवठा करत आला आहे. थोडक्यात फ्रेंच साम्राज्यवादाच्या प्रभावाखालून निघून आता बुर्कीना फासो रशियन-चिनी साम्राज्यवादी अक्षाच्या प्रभावात येत आहे. रशिया त्याच्या साम्राज्यवादी महत्वाकांक्षा बाळगून आहेच, आणि आफ्रिकेतील बाजार व खनिज संपदेवर त्याची नजर आहे. अशात जिहादी बंडखोरांच्या विरोधात लढण्यासाठी मदत करण्याच्या हेतूने आणि पुन्हा एकदा देशात "लोकशाही आणि शांतता" स्थापित करण्याच्या हेतूने रशियाला बुर्कीना फासो, नायजर, माली सारख्या आफ्रिकन देशात पकड मजबूत करण्याची चांगली संधी मिळाली आहे. जुलै महिन्यात झालेल्या रशिया आफ्रिका परिषदेत रशियन सरकारने अनेक देशांना मानवतावादी सहाय्य करण्यासाठी यूएन वर्ल्ड फूड प्रोग्रामला स्वयंसेवी सहाय्य म्हणून 10 दशलक्ष यूएस डॉलर्सचे योगदान देण्याचा निर्णय घेतला होता, त्यापैकी 2.5 दशलक्ष यूएस डॉलर्स बुर्कीना फासोला जाणार आहेत. तसेच रशिया बुर्कीना फासोत वाहतूक, व्यापार, वीज निर्मिती इत्यादी साठी मदत करणार आहे. थॉमस संकाराचे नाव घेऊन, त्याच्या स्वप्नांना साकार करण्याचे वादे करून इब्राहिम तरोरे जनतेवर प्रभाव तर टाकत आहे, परंतु संकाराचे शब्द "जो तुम्हाला खायला देतो तो त्याच्या इच्छा तुमच्यावर लादतो." मात्र सोयीस्करपणे वगळून.

संकारा मार्क्सवादी-लेनिनवादी विचारांनी प्रभावित एक क्रांतिकारी नेता होता, ज्याच्याकडे एका क्रांतिकारी पक्षाच्या निर्मितीच्या दूरदृष्टीकोनाचा अभाव होता. वैयक्तिक त्याग, प्रामाणिकपणा, मेहनत, आणि जनतेप्रती समर्पण यामुळे तो देशाच्या भांडवली विकासाच्या प्रक्रियेत अत्यंत प्रगतीशील भुमिका निभावत असताना त्याने साम्राज्यवादाविरोधात लढा दिला. या प्रक्रियेत त्याने जनतेच्या पुढाकारावर तर विश्वास ठेवला, परंतु समाजाच्या आमूलाग्र भांडवली आणि समाजवादी परिवर्तनाकरिता आवश्यक अशा लेनिनवादी बोल्शेविक पक्षाच्या उभारणीचे काम तो करू शकला नाही. त्याच्या अभावामध्ये संकाराच्या मृत्यूनंतर बुर्किना फासोमधील भांडवलदार वर्गाचे अधिनायकत्त्व अधिकच मजबूत होत गेले.

आज आफ्रिकेतील बहुसंख्य देशांसहीत जगातील बहुसंख्य देशांमध्ये भांडवली आर्थिक व्यवस्था रूढ आहे, आणि समाजवादी क्रांत्यांचा टप्पा आहे. परंतु एका सशक्त कामगार वर्गीय आंदोलनाच्या आणि कामगार वर्गाच्या क्रांतिकारी पक्षाच्या अनुपस्थित भांडवली अधिनायकत्व टिकून आहे. संकारासारख्या क्रांतिकारी नेत्यांच्या जीवनापासून धडे घेत असताना, क्रांतिकारी कामगार पक्ष उभारणीच्या पायाभूत कार्यभाराच्या अपरिहार्यतेची जाणीव गरजेची आहे.

# पॅलेस्टाईनच्या स्वातंत्र्यलढ्याशी भारतीय राज्यसत्तेची प्रतारणा!

पान 12 वरून

गणिते करत आहे, आणि साम्राज्यवादी गणितांच्या समीकरणात बेरजा-वजाबाक्या करत आहे. अशाप्रकारे पॅलेस्टिनी जनता आज पुन्हा एकव्याने धिरोदात्तपणे लढत आहे.

पॅलेस्टाईनची फाळणी करून ज्यू धमाधारित, झायोनिझमच्या वंशवादी विचारावर आधारित इस्रायल देशाच्या निर्मितीला 1948 मध्ये भारताने विरोध केला होता. नंतरच्या काळात मात्र हळूहळू भारतातील भांडवलदार वर्गाच्या सरकारांनी इस्रायलसोबत संबंध प्रस्थापित केले, परंतु जगभरातील ब्रिटन-फ्रांसादी देशांच्या वसाहतिक राजवटीखाली भरडलेल्या जनतेने नेहमीच पॅलेस्टाईनच्या स्वातंत्र्यलढ्याला साथ दिली. 1991 पर्यंत भारतही निर्णायकपणे जागतिक मंचांवर पॅलेस्टाईनच्या समर्थनातच भूमिका घेत होता. परंतु 1991 मध्ये जागतिक साम्राज्यवादी भांडवलसोबतच्या युतीला खाउजा धोरणांद्वारे पुढे नेत असताना, काँग्रेसच्या नरसिंहराव सरकारने इस्रायलसोबत औपचारिक संबंधांचे नवे युग सुरू केले. यालाच पुढे नेत आता हिंदुत्ववादी भाजपने साम्राज्यवादासोबत आपल्या नात्याला नग्नपणे खुले करत इस्रायलचे समर्थन खुलेपणाने सुरू केले आहे.

मोदी सरकारच्या कार्यकाळात इस्रायलसोबत शस्त्रास्त्र व्यापार तर पुढे गेलाच आहे, परंत सामान्य जनतेवर, राजकीय कार्यकर्त्यांवर, पत्रकार, विरोधक यांच्यावर सरकारला बेकायदेशीर पाळत ठेवाता यावी याकरिता लागणारे पेगसस नावाचे हेरगिरी-सॉफ्टवेअर इस्रायलने भारत सरकारला विकले आहे, ज्याचा वापर करून देशातील अनेक राजकीय नेते, जनपक्षधर कार्यकर्ते, पत्रकार, इत्यादींवर हेरगिरीचे मामले समोर आले आहेत. मोदींनी इस्रायलचे प्रधानमंत्री नेत्यानाहूंना आपला जीवलग मित्रसुद्धा (अपेक्षेप्रमाणे!) जाहीर केले आहे. युनोतील युद्धबंदीच्या ठरावावर यामुळेच भारताने तटस्थ राहून एकप्रकारे इस्रायलच्या युद्धाचे समर्थनच केले आहे.

खरेतर मूर्तीपुजा वर्ज्य मानणाऱ्या ज्यू धर्माच्या एका विचारधारेनुसार सर्व मूर्तीपूजक धर्म व व्यक्ती चुकीचे आहेत, आणि काही कट्टरतावादी ज्यू तर हिंदुंच्या शिरकाणाची वक्तव्ये सुद्धा करत असतात. परंतु धर्मवादाच्या आडून भांडवलदार वर्गाच्या निरंकुश सत्तेचे समर्थन करणाऱ्या झायोनिझमच्या राजकीय विचारधारेशी असलेले हिंदू धर्माचे राजकारण करणाऱ्या हिंदुत्वाचे जवळिकीचे नाते आश्चर्याचे नाही. झायोनिझमच्या ज्या विचारावर इस्रायल देश उभा आहे, त्याची हिंदुत्वाशी जवळीक असण्याची कारणे ही भांडवलदार वर्गाच्या सत्ताकारणात, साम्राज्यवादी समीकरणात आणि शोषकांच्या वैचारिक एकतेत आहेत. धर्माधारित राष्ट्राची स्थापना करत असताना बळाच्या आधारावर इतर राष्ट्रीयतांचे दमन करत, कामगार-कष्टकऱ्यांचे शोषण व दमन करण्याला खुली सूट देत असताना इस्लामला खोटा शत्रू म्हणून उभा करत, वास्तवात भांडवलदार वर्गाची नग्न हुकूमशाही निर्माण करण्याच्या वैचारिक एकतेच्या आधारावर ही झायोनिस्ट-हिंदुत्व युती उभी आहे. त्यामुळेच आज संपूर्ण गोदी मिडीया जणू काही 8 ऑक्टोबर अगोदर काही घडलेलेच नाही अशा आविर्भावात पॅलेस्टिनी स्वातंत्र्यलढ्याची संपूर्ण पूर्वपीठिका गाळून हमासला दहशतवादी म्हणत भारतात धार्मिक तणाव भडकावण्याचे काम करत आहे, आणि इस्लामोफोबियाने ग्रस्त अंधभक्त चेकाळल्यासारखे इस्रायलच्या समर्थनात भगवे झेंडे घेऊन उतरले आहेत. इस्लामोफोबिया, इतर धर्मीयांना दुय्यम नागरिकत्व, सैन्यबळावर अखंड भारताची योजना यासाररख्या कल्पनांचे प्रतिबिंब झायोनिझम मध्ये पाहत संघपरिवाराच्या पिलावळी इस्रायलच्या समर्थनात उतरल्या आहेत.

हमासने केलेल्या हल्ल्याच्या विरोधात इस्रायलला प्रतिकाराचा अधिकार आहे अशाप्रकारचे तर्क देत भारत सरकारने आणि देशातील अनेक उदारवाद्यांनी पॅलेस्तिनी जनतेचा प्रतिकार व इस्रायलचे आक्रमण यांना एकाच तागडीत तोलून निषेध केला आहे. परंतु बचावाचा अधिकार हल्लेखोरांना नसतो! साम्राज्यवादी, वसाहतवादी शक्तींचा हल्ला, त्यांचे दमन आणि दमित, शोषित जनतेने प्रतिकारात केलेली हिंसा यांना एकसारखे मोजणे अन्यायाचे समर्थनच आहे. ज्याप्रकारे आफ्रिकेतील, आशियातील अनेक देशांनी ब्रिटीश, फ्रेंच व इतर साम्राज्यवाद्यांच्या विरोधात सशस्त्र लढे उभे केले, त्याच पद्धतीने पॅलेस्टिनी जनतेला सुद्धा योग्य वाटेल त्या मार्गाने लढण्याचा मार्ग निवडण्याचा अधिकार आहे. हमास एक धर्मवादी, इस्लामी विचारपंथी संघटना आहे, आणि निश्चितपणे तिचा विचार कामगार वर्गाच्या विचारधारेच्या विपरीत आहे, परंतु पॅलेस्टाईन मधील प्रमुख अंतर्विरोध आज राष्ट्रीय मुक्ती आहे, आणि पॅलेस्टिनी जनतेला तिचे नेतृत्व निवडण्याचा अधिकार नक्कीच आहे.

गेली अनेक दशके इस्रायलच्या राजकारणावर लिकुड या अति-उजव्या पक्षाचे प्रभुत्व आहे. पॅलेस्टाईनचे अस्तित्व नाकारत, द्विराष्ट्र उपायाला धुडकावून लावत, पॅलेस्टिनींच्या सर्व जमिनीवर कब्जा करण्याचे धोरण सतत त्यांनी अवलंबले आहे. इस्रायलमध्ये राहणारे अरब नागरिक आज दुय्यम दर्जाचे जीवन जगण्यास बाध्य आहेत. हमासने सुद्धा इस्त्रायलचे अस्तित्व नाकारत राजकारणाची सुरूवात केली. 2006 च्या निवडणुकांमध्ये हमास पॅलेस्टाइनमधील सर्वाधिक मते घेणारा राजकीय पक्ष म्हणून समोर आली. त्यानंतर द्विराष्ट्र उपायावर हमासने हा हमासचा नव्हे तर जनतेच्या निर्णयाचा प्रश्न आहे ही भूमिका घेतली आहे. परंतु कोणत्याही वंशवादी, धार्मिक आधारावर उभे असलेले राष्ट्र हे नेहमीच संघर्षांना जन्म देत राहील. त्यामुळे धर्मनिरपेक्ष, लोकशाही आधारावर उभा राहिलेला मुस्लिम, ख्रिस्चन, ज्यू, ड्रुझे, अशा सर्व धर्मीय लोकांचा पॅलेस्टाईन देश बनणे हाच या संघर्षावर उपाय होऊ शकतो. त्याकरिता आवश्यक असलेले कामगार वर्गाचे राजकारण आज दोन्ही देशात अत्यंत कमजोर आहे. पॅलेस्टिनी जनतेच्या दुर्दम्य इच्छाशक्तीला समोर आणत असतानाच, ऑक्टोबर पासून सुरु झालेल्या संघर्षाने पुन्हा एकदा समोर आणले आहे की जगातील पॅलेस्टाइनसारख्या सर्वच न सुटलेल्या राष्ट्रीय मुक्ती आंदोलनांचा प्रश्न आता थेट साम्राज्यवादी समीकरणांचा आणि त्यामुळेच जगाच्या स्तरावर साम्राज्यवादाला जन्म देणाऱ्या भांडवलदार वर्गाविरोधात कामगार वर्गीय क्रांत्यांचा प्रश्न बनलेला आहे.

# थॉमस संकारा : आफ्रिकन क्रांतिकारी

## थॉमस संकाराच्या जन्म व स्मृतीदिनानिमित्त त्याच्या कार्याची ओळख करून देणारा लेख

✍ राहुल साबळे

आफ्रिकेतील अत्यंत गरीब देशात ज्याने भांडवलशाही व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले, जगातील साम्राज्यवादी देशांना घाबरून सोडले, ज्याला वयाच्या 37 व्या वर्षी आपले प्राण गमवावे लागले. ज्याला आफ्रिकेचा चे गुवारा म्हणून ओळखले जाते, तो थॉमस संकारा (21 डिसेंबर 1949 – 15 ऑक्टोबर 1987). काँग्रेससारख्या भांडवलदार वर्गाच्या पक्षाच्या नेतृत्वात दबाव-तडजोड-दबाव या तडजोडीच्या मार्गाने स्वातंत्र्यलढा लढलेल्या भारतातील जनतेपर्यंत आफ्रिकेतील देशांमध्ये झालेल्या क्रांतिकारी स्वातंत्र्यलढ्यांची आणि साम्राज्यवाद विरोधी लढ्यांची माहिती पोहोचूच दिली जात नाही. साम्राज्यवादाविरोधात मूलगामी लढा उभारणाऱ्या थॉमस संकाराच्या जीवनाबद्दल म्हणूनच जाणले पाहिजे.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात अप्पर व्होल्टा(बुर्कीना फासो) देश फ्रेंच वसाहत होता. या सत्तेविरोधात बुर्किनाजी लोकांच्या स्वातंत्र्यलढ्याची परिणती 1960 मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळण्यात तर झाली, परंतु फ्रेंचांनी सत्ता सोडताना मॉरिस यामिएगोच्या नेतृत्वातील वोल्टेईक डेमोक्रॅटिक युनियन या फ्रेंच धार्जिण्या पक्षाकडे सूत्रे सोपवली. यानंतर अनेक लष्करी बंडांनी भरलेल्या बुर्कीना फासोच्या इतिहासात, फ्रेंच साम्राज्यवादाच्या विरोधात स्वतंत्र भांडवली विकासात थॉमस संकाराचे राजकीय जीवन एक महत्त्वपूर्ण टप्पा होता.

### थॉमस संकाराचे प्रारंभिक जीवन

थॉमस इसिडोर नोएल संकाराचा जन्म 21 डिसेंबर 1949 रोजी अप्पर व्होल्टा (आता बुर्कीना फासो) मधील याको शहरात झाला. त्या वेळी अप्पर व्होल्टा ही फ्रेंच वसाहत होती आणि त्याचे वडील वसाहतिक सरकारच्या नोकरीत असलेल्या काही आफ्रिकन लोकांपैकी एक होते. थॉमस संकारा अभ्यासू आणि मेहनती होता, तो विशेषतः गणित आणि फ्रेंचमध्ये चांगला होता. त्याच्या वडिलांची इच्छा होती की त्याने पौरोहित्यात प्रवेश करावा, परंतु थॉमसने त्याऐवजी सैन्यात सामील होण्याचा निर्णय घेतला.

1966 मध्ये, वयाच्या 17 व्या वर्षी, थॉमस संकाराने देशाची राजधानी वागाडूगू येथील लष्करी विद्यालयात प्रवेश केला. तेथे असताना, संकाराने लेफ्टनंट-कर्नल संगौले लामिझाना यांच्या नेतृत्वाखाली अप्पर व्होल्टामध्ये पहिले लष्करी बंड पाहिले. लष्करी विद्यालयात सामाजिक शास्त्रांमध्ये प्रशिक्षित अनेक स्थानिक प्राध्यापक होते, ज्यांनी थॉमस संकाराला वसाहतवादविरोधी, साम्राज्यवादविरोधी आणि मार्क्सवादी यांसारख्या अनेक विचारधारांची ओळख करून दिली. तीन वर्षांनंतर, संकाराने वागाडूगू सोडले आणि मादागास्करमध्ये पुढील लष्करी प्रशिक्षण घेतले. मादागास्करमध्ये असताना त्याने राष्ट्राध्यक्ष फिल्बर्ट सिराNाना यांच्या सरकारच्या विरोधात लोक उठाव पाहिला होता. 1972 मध्ये, संकारा अप्पर व्होल्टाला परतला तेथे त्याने अप्पर व्होल्टा आणि माली यांच्यातील सीमा युद्धात भाग घेतला आणि या संघर्षात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

संकारा गिटार वादक सुद्धा होता. वागाडूगूम मध्ये टाउट-अ-कू जाझ नावाच्या बँडमध्ये सुद्धा तो सामील झाला होता. बँडचा उत्कृष्ट गिटारवादक म्हणून त्याला प्रसिद्धी सुद्धा मिळाली होती. संगीतकार म्हणून यश मिळवूनही त्याने आपली लष्करी कारकिर्द सुरू ठेवली. 1976 मध्ये, तो देशाच्या दक्षिणेकडील पो शहरात कमांडो प्रशिक्षण केंद्राचा कमांडर बनला. त्याच वर्षी, तो कम्युनिस्ट ऑफिसर्स ग्रुप नावाच्या गुप्त संघटनेत सामील झाला. ज्यामध्ये ब्लेझ कंपाओरे याचाही समावेश होता, ज्याने भविष्यात थॉमस संकाराच्या मृत्यूचा कट रचला.






### राष्ट्रपतीपदापूर्वीचे जीवन

1981 मध्ये, थॉमस संकाराला राष्ट्रपती साये झर्बो यांच्या लष्करी सरकारच्या अंतर्गत माहिती मंत्री म्हणून पहिले सरकारी पद मिळाले. त्याच्या मंत्रिपदाच्या काळात इतर मंत्र्यांचे ऐयाश जीवन पाहून तो अवाक झाला होता आणि त्याने स्वतःला त्यापासून शक्य तितके दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. इतर लोक महागड्या गाड्यांमधून कामाला निघाले, तर संकाराने सायकल चालवली. संकारा निर्भीड आणि प्रामाणिक राहिला, त्याने प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला, ज्यामुळे सरकारी घोटाळे उघडकीस आले, साहजिकच इतर सहकाऱ्यांना तो नापसंत होत गेला. एप्रिल 1982 मध्ये त्याने मंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्याच वर्षाच्या उत्तरार्धात, दुसरे बंड झाले आणि सत्तापालट होऊन मेजर डॉक्टर जीन-बॅप्टिस्ट ओएड्रॉगो सत्तेवर आले. त्यांनी थॉमस संकाराला पंतप्रधान म्हणून नियुक्त केले. बदललेल्या सरकारमध्ये सुद्धा संकराने प्रगतीशील सुधारणांना लागू करण्याचा प्रयत्न केला आणि पुन्हा आपल्या सहकाऱ्यांचा राग ओढवून घेतला. त्याच्यावरील अविश्वास इतका वाढला की त्याला चार महिन्यांत बडतर्फ करण्यात आले आणि नंतर तुरुंगात टाकण्यात आले.

विद्यमान सरकारसाठी ती एक घातक चूक सिद्ध झाली, कारण संकाराने सैन्यात मोठा पाठिंबा मिळवला होता आणि त्याच्या तुरुंगवासामुळे त्याचा सहकारी अधिकारी ब्लेझ कंपाओरे याला बंडाचे नेतृत्व करण्यासाठी आणि जीन-बॅप्टिस्ट ओएड्राओगोचे सरकार पदच्युत करण्यासाठी महत्त्वपूर्ण गती मिळाली. 4 ऑगस्ट 1983 रोजी थॉमस संकाराला अप्पर व्होल्टाचे अध्यक्ष करण्यात आले.

### थॉमस संकाराचा राष्ट्रपती काळ

थॉमस संकारावर चे गुवारा सारख्या क्रांतिकारकांच्या विचारांचा आणि कामाचा प्रभाव होता. त्याने संपूर्ण जीवन साम्राज्यवादाविरोधी संघर्षासाठी समर्पित केले होते. त्याचा राष्ट्रपती काळ हा केवळ चार वर्षांचा होता पण त्या चार वर्षांत त्याने देशातील लोकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणला.

फ्रेंच साम्राज्यवादाच्या प्रभावाला संपवण्यासाठी आणि देशाच्या क्रांतिकारी भांडवली विकासासाठी संकाराने अनेक पावले उचलली.

थॉमस संकाराने देशाचे नाव बदलून "बुर्कीना फासो" केले, ज्याचा अर्थ मूर आणि ड्युला या देशातील दोन प्रमुख भाषांमध्ये "प्रामाणिक आणि जबाबदार लोकांची भूमी" असा होतो. त्याने देशाचा ध्वजही बदलला आणि नवीन राष्ट्रगीत लागू केले. अध्यक्षपद मिळाल्यावर त्याने जन विकास कार्यक्रम हाती घेतले. त्याचे पहिले धोरण बुर्कीना फासोच्या लोकांचे जीवनमान सुधारणे हे होते. त्याने लोकांना घरे, आरोग्यसेवा आणि अन्न पुरवण्यासाठी विविध योजना अंमलात आणल्या, ज्यामुळे देशातील गरिबी मोठ्या प्रमाणात कमी झाली. संकाराने सर्व जमीन आणि तेल संपत्तीचे राष्ट्रीकरण केले आणि फ्रेंच भांडवलाला हादरे दिले.

मेंदुज्वर, पोलिओ आणि गोवरचा सामना करण्यासाठी त्याने देशभर लसीकरण मोहीम सुरु केली. 1983 ते 1985 पर्यंत, दोन दशलक्ष म्हणजेच लोकसंख्येच्या एक चतुर्थांश लोकांचे लसीकरण करण्यात आले. संकाराच्या कारकिर्दीत बुर्कीना फासो हा एड्सच्या साथीला ओळखणारा पहिला आफ्रिकन देश ठरला होता. त्याने देशात गृहनिर्माणाला प्राधान्य दिले गेले आणि देशातील मोठ्या झोपडपट्ट्यांचे निर्मूलन करण्यासाठी विटांचे कारखाने उभारण्यात आले. एका विशाल रेल्वे आणि रस्त्याच्या जाळ्याने लवकरच देशाच्या सर्व भागांना जोडले आणि जंगलतोड रोखण्यासाठी एक कोटी झाडे लावली. संकारा हा निर्विवादपणे पहिला आफ्रिकन नेता होता ज्याने पर्यावरणाच्या समस्येला इतके अधिक प्राधान्य दिले, विशेषत: अशा वेळी जेव्हा पर्यावरणाच्या समस्येला जगावर परिणाम करणारा प्रमुख घटक म्हणून पाहिले जात नव्हते. झाडे झुडुपे जाळणे, गुरांना मोकाट चरण्यासाठी सोडणे आणि बेकायदेशीर सरपण तोड थांबविण्यासाठी संकाराने विविध कायदे अंमलात आणले.

भ्रष्टाचाराने बरबटलेल्या आणि विकासात पिछाडलेल्या बुर्कीना फासोमध्ये थॉमस संकाराच्या कार्यामुळे जनतेचा व्यापक पाठिंबा मिळाला. सामान्यत: सरकारी मंत्र्यांना परवडणाऱ्या सुखसोयी नाकारून त्याने आपल्या देशातील लोकांशी एकता दाखवली. त्याने मर्सिडीजचा गाडीचा सरकारी ताफा विकला आणि त्याच्या जागी बुर्कीना फासोमध्ये उपलब्ध असलेली सर्वात स्वस्त कार रेनॉल्ट वापरली. बुर्किनाबे लोकांसाठी उपलब्ध नसलेली अनावश्यक लक्झरी म्हणून त्याने त्याच्या कार्यालयात वातानुकूलन (एसी) वापरण्यास नकार दिला. त्याने स्वतःला जनतेसमोर एक नम्र माणूस म्हणून सदर केले. भिंती आणि सार्वजनिक इमारती सजवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या स्वत:च्या प्रतिमेचा त्याने विरोध केला.

### महिलांच्या स्थितीत क्रांतिकारी सुधार

देशभरातील महिलांची परिस्थिती सुधारणे हे संकारा सरकारच्या मुख्य कामांपैकी एक काम होते. त्याच्या शब्दांत "क्रांती आणि स्त्रीमुक्ती एकत्रच चालते. आम्ही स्त्रीमुक्तीबद्दल धार्मिक कृती म्हणून किंवा मानवी करुणेच्या भावनेने बोलत नाही. क्रांतीचा विजय होण्यासाठी स्त्रीह मुक्ती ही मूलभूत गरज आहे." सत्तेत आल्यावर पहिल्याच वर्षी त्याने कुटुंब विकास मंत्रालय आणि बुर्कीना महिला संघाची स्थापना केली. ज्याचा हेतू त्याच्या शब्दांत "आमच्या देशातील महिलांना यशस्वी लढा देण्यासाठी एक संरचना आणि योग्य साधने देणे" होता. त्याने बहुपत्नीत्व आणि हुंडाबळी प्रथांवर बंदी आणली; त्याचबरोबर स्त्रियांचे जबरदस्ती होणारे विवाह आणि स्त्रीचे जननेंद्रिय विच्छेदन प्रथेवर बंदी आणली. त्याने स्त्रियांना नवीन अधिकार दिले ज्यात विधवा आणि अनाथांसाठी वारस हक्काचा समावेश होता. महिलांना शिक्षणात प्रवेश मिळावा यासाठी शिक्षण मंत्रालयाने विविध उपक्रम राबवले तसेच बऱ्याच महिलांना सरकार आणि सैन्यात वरिष्ठ पदे देण्यात आली होती, जी त्या वेळी कोणत्याही आफ्रिकन देशात अभूतपूर्व होती. संकाराने आपल्या भाषणांत सुचवले की पुरुषांनी समाजातील स्त्रियांचे स्थान अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी स्त्रियांना अपेक्षित असलेले काम करण्याचा प्रयत्न करावा. आपल्या अध्यक्षपदाच्या काळात, संकाराने महिलांना सरकारी पदांवर नियुक्त केले आणि घटनेत दुरुस्ती केली, मंत्रीमंडळात प्रत्येक वेळी किमान पाच महिला मंत्री असणे बंधनकारक केले.

### थॉमस संकाराचा साम्राज्यवाद विरोधी लढा

थॉमस संकारा हा मार्क्सवाद लेनिनवादाने प्रभावित होता. फ्रेंच साम्राज्यवादाला नाकारत, जागतिक साम्राज्यवादी भांडवलाच्या विरोधात बुर्कीना फासोच्या स्वतंत्र विकासाचा तो प्रवर्तक होता. भांडवलशाहीचा विरोध करून बुर्कीना फासोला एक समाजवादी देश बनवण्याचे स्वप्न तो बाळगून होता. देशातील साम्राज्यवादी शक्ती असलेला फ्रांस तसेच इतर साम्राज्यवादी देशांचा तो खुला विरोध करत होता. त्याने बुर्कीना फासोमधील प्रत्येक गाव आणि शहराला क्रांतीच्या संरक्षणासाठी समित्यांमध्ये संघटित करण्याचे आवाहन केले. संकाराने सर्व जमिनींचे राष्ट्रीयीकरण केले होते आणि शेतीमध्ये मोठी गुंतवणूक केली होती. क्रांतिकारी भूसुधार लागू करत त्याने सामंतांच्या जमिनींचे शेतकऱ्यांमध्ये पुनर्वाटप करवले. शेतीतील सुधारणांमुळे त्याच्या अध्यक्षपदाच्या पहिल्या तीन वर्षांमध्ये अन्नधान्य उत्पादनात 75 टक्क्यांनी वाढ झाली होती, अशा देशात ज्या जेथे बहुतेक लोक शेतीवर फक्त उदरनिर्वाह करणारे होते.

जगातील सर्वात गरीब देशांपैकी एक राष्ट्राध्यक्ष म्हणून, संकाराचा विश्वास होता की बुर्कीना फासो परदेशी मदतीशिवाय स्वतःला

पान 10 वर

# पॅलेस्टाईनच्या स्वातंत्र्यलढ्याशी भारतीय राज्यसत्तेची प्रतारणा!

## हिंदुत्ववाद-झायोनिझमच्या मानवद्रोही युतीचा कारनामा!

✎ अभिजित


भारतातील गोदी मीडियाने पुन्हा एकदा खोटारडेपणाचा कळस गाठत भारतीय जनतेला पॅलेस्टाइन विरोधाचे डोस पाजण्याचे काम चालवले आहे. जनविरोधी मोदी सरकारचे चाटूकार बनलेल्या या मीडियाकडून अपेक्षाही काय केली जाऊ शकते? इंग्रजांचे तळवे चाटण्यात धन्यता मानणाऱ्या, साम्राज्यवादाचे हस्तक म्हणून काम करणाऱ्या भारतातील हिंदुत्ववादी शक्ती आज सत्तेत असताना त्यांचे खरे रंग दाखवत पुन्हा एकदा नागडेपणाने अमेरिका प्रणीत साम्राज्यवादी अक्षाच्या बाजूने उभे राहत पॅलेस्टाईन-इस्रायल संघर्षात इस्रायलची भलावण करत उभ्या आहेत. जगाच्या इतिहासात सर्वाधिक धीरोदात्तपणे, सर्वाधिक त्यागाने आणि झुंजारपणे लढल्या जात असलेल्या पॅलेस्टाईनच्या स्वातंत्र्यलढ्याशी प्रतारणा करत भारताच्या राज्यसत्तेने गेल्या महिन्याभरात अनेक भूमिका घेतल्या आहेत ज्या साम्राज्यवादी अमेरिका-इस्रायल युतीला पाठिंबा देणाऱ्या आहेत. इतिहासातील एक सर्वाधिक क्रूर मानववंशसंहार नोव्हेंबर 2023 मध्ये गाझा मध्ये चालू असताना भाजप सरकारने बघ्याची भूमिका स्वीकारली आहे.

7 ऑक्टोबर रोजी पॅलेस्टाईनच्या गाझा पट्टीतील एक राजकीय-लष्करी संघटना असलेल्या इस्लामिक विचारधारेच्या हमासने इस्रायलवर हल्ले केले आणि अनेक सैनिक व नागरिकांना बंदी बनवले. जगातील सर्वात मोठा निरपराध लोकांचा खुला तुरुंग असलेल्या गाझा पट्टीचा हा 'जेल ब्रेक' होता! अशा प्रकारचे हल्ले आणि बंदी बनवण्याचे काम वसाहतवादी इस्रायल गेली 70 वर्षे सतत पॅलेस्टिनी नागरिकांच्या विरोधात करत आला आहे. पॅलेस्टिनी लोकांच्या जमिनीवर शस्त्रबळाने कब्जा करून लाखो पॅलेस्टिनींना त्यांच्याच देशातून निर्वासित करून अमेरिकन व ब्रिटीश साम्राज्यवादाच्या सहाय्याने 1948 मध्ये इस्रायलची स्थापना झाल्यानंतर, अनेक झडपा, 1967 चे अरब युद्ध व सतत चाललेल्या वसाहतींच्या स्थापनेच्या प्रक्रियेतून आज पॅलेस्टाईनच्या जवळपास सर्व भूमीवर झायोनिस्ट इस्रायल 'देश' बनला आहे. हा देश नाहीतर एक 'सेटलर कॉलनी', एक वसाहत आहे, ठीक त्याच पद्धतीची जशी ब्रिटीश आणि इतर साम्राज्यवाद्यांनी जगात इतरत्र बनवल्या. सर्व आंतराष्ट्रीय कायदे, युनोचे ठराव धुडकावून लावत अमेरिकन साम्राज्यवादाच्या शस्त्र व निधीच्या जोरावर लष्करी शक्ती बनलेल्या इस्रायलने वसाहतवादी धोरण पुढे नेत पॅलेस्टिनींच्या राहिलेल्या सुद्धा जमिनी बळकावण्याचे, तेथे "सेटलर कॉलनी" बनवण्याचे, पॅलेस्टिनी जनतेच्या दडपशाहीचे धोरण सतत चालू ठेवले आहे. नकाशात दाखवल्याप्रमाणे 1948 साली युनोने आश्वासन दिलेला पॅलेस्टाईन देश कधी अस्तित्वात आलाच नाही, आणि आज तर शेकडो जमिनी-बेटांच्या रूपात वेस्ट बँक व छोटीशी गाझा पट्टी यात पॅलेस्टिनी जनतेला व्यावहारिकरित्या कैद करण्याचे काम इस्रायलने केले आहे.

गेल्या 3 दशकात धर्मनिरपेक्ष पॅलेस्टिनी स्वातंत्र्यलढ्याला भरकटवण्यासाठी एकीकडे इस्रायल-अमेरिकेनेच निधी पुरवून हमाससारख्या इस्लामिक विचारधारेच्या संघटनांना खतपाणी घातले, ज्यात इस्रायलचे सध्याचे प्रधानमंत्री बेंजामिन नेत्यान्याहू आणि त्यांच्या लिकुड पक्षाचा मोठा वाटा आहे, तर दुसरीकडे पीएलओच्या नेतृत्वातील पॅलेस्टिनी भांडवलदार वर्गाच्या नेतृत्वातील आंदोलनाने कचखाऊपणा दाखवत इस्रायलशी तडजोडीचे धोरण स्वीकारले. यामुळे पॅलेस्टिनी जनतेचा मोठा हिस्सा लढाऊ भूमिका घेणाऱ्या हमासमागे जाऊ लागला आणि विशेषत: गाझा पट्टीमध्ये हमास मुख्य राजकीय-लष्करी शक्ती म्हणून पुढे आली. 2006 मधील निवडणुकांमध्ये हमासने सर्वाधिक मते मिळवली.

गेल्या वर्षभरातीलच घटनांकडे लक्ष टाकले तरी लक्षात येईल की इस्रायलद्वारे किती अमानुषपणे वेस्ट बँक व गाझा पट्टीतील नागरिकांचा छळ केला जातो. 2023 मध्येच जानेवारी, जुन, जुलै महिन्यात वेस्ट बँक येथील जेनीन निर्वासित कॅंपवर इस्रायली सैनिकांनी छापे मारले आणि सामान्य पॅलेस्टिनी लोकांना, ज्यात महिलाचाही समावेश होता, ठार मारले आणि शेकडोंना जखमी केले. एप्रिल 2023 मध्ये जेरूसलेम येथील मुस्लिमांकरिता पवित्र मानल्या जाणाऱ्या अल-अक्सा मशिदीत घुसून इस्रायली सैनिकांनी केलेल्या मारहाणीत किमान 50 पॅलेस्टिनी नागरिक जखमी झाले. वर्षभरात किमान 247 पॅलेस्टिनींना इस्रायलने ठार मारले होते.

9 ऑक्टोबर रोजी हमासने केलेला हल्ला, हा पॅलेस्टिनी जनतेचा प्रतिकाराचा हल्ला आहे. गाझा पट्टी ही जगातील सर्वात मोठे खुले जेल आहे. समुद्राच्या पश्चिम बाजू सहीत, वीज संचालित तारांच्या कुंपणासहित, चाऱ्ही बाजूने इस्रायलने वेढा घातलेल्या 40 वर्ग किमीच्या गाझा पट्टीत 20 ते 30 लाख लोक राहतात. जगातील सर्वाधिक घनतेच्या या प्रदेशातील दळणवळण, पाणी, वीज, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा हा सर्व इस्रायली सैन्याच्या नियंत्रणात चालतो. 40 ते 50 टक्के इतकी प्रचंड बेरोजगारी असलेल्या गाझा पट्टीत जगातील सर्वाधिक हलाखीचे जीवन मोठ्या लोकसंख्येला जगावे लागते. अशामध्ये आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचे आंदोलन गेली 70 वर्षे जीवंत ठेवण्याचे काम येथील जनतेने प्रचंड धैर्य आणि शौर्याने चालवले आहे. इस्रायलने आजवर असंख्य वेळा गाझापट्टीतील लोकांवर हल्ले केले आहेत. अशामध्ये 9 ऑक्टोबर रोजी हमासने केलेल्या हल्ल्यामध्ये अनेक इस्रायली सैनिकांना व सामान्य नागरिकांना कैद केले गेले. इस्रायलच्या अत्याधुनिक सैन्याच्या शक्तीचे, त्यांच्या मोसाद या गुप्तहेर यंत्रणेचे, तंत्रज्ञानातील त्यांच्या सामर्थ्याचे दाखले देण्यात जगातील मीडीया कधीही थकत नाही. परंतु 7 ऑक्टोबर रोजीच्या हल्ल्याने या दाव्यांच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. या हल्ल्यामध्ये हमासने लहान मुलांची मुंडकी उडवल्याची अफवा लागलीच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आणि जागतिक भांडवली मीडियाने पसरवली, जी खोटी असल्याचे नंतर समोर आले. सामान्य नागरिक व मुलांवर हल्ल्यांच्या आरोपाला हमासने नाकारले आहे (हे विसरता कामा नये की पॅलेस्टिनी मुले गेली 70 वर्षे नियमितपणे इस्रायलचा निशाणा बनत आली आहेत!). यानंतर लगेचच हमासने अशाचप्रकारे इस्रायलने कैदेत ठेवलेल्या सैनिक व नागरिकांच्या अदलाबदलीचा प्रस्ताव दिला, परंतु त्याला धुडकावून लावत इस्रायलने युद्ध जाहीर केले. युद्धबंदीच्या ठरावावर युनोच्या संरक्षण परिषदेत अमेरिकेने नकाराधिकाराचा वापर करत इस्रायलच्या युद्धाचे खुले समर्थन केले आहे. 27 ऑक्टोबर रोजी युनोच्या सर्वसाधारण सभेत प्रचंड बहुमताने पारित झालेला युद्धबंदीचा ठराव झुगारून लावत, अमेरिकेच्या नकाराधिकाराच्या जोरावर इस्रायलने हल्ला सुरूच ठेवला आहे.




पॅलेस्ताईनच्या जमिनीचे हरण: 1946 ते 2009

इस्रायलने ऑक्टोबरच्या मध्यापासून गाझापट्टीवर वाढत्या गतीने हल्ले सुरू केले आहेत. यामध्ये आत्तापर्यंत 13,000 च्या वर पॅलेस्टिनी नागरिकांचे प्राण गेले आहेत, ज्यात 5,500 च्या वर लहान मुले आहेत्. जगामध्ये लहान मुलांच्या सर्वाधिक जड शवपेट्या जर कोणी वाहिल्या असतील तर ती पॅलेस्टाईनची जनता आहे. हमासला नष्ट करण्याचे उद्दिष्ट जाहीर करण्याच्या नावाखाली इस्रायलने गाझापट्टीवर अपरंपार बॉंब वर्षाव करत सामान्य नागरिकांचे जीव तर घेणे चालवलेच आहे, परंतु घरे, शाळा, इस्पितळे यांचे अतोनात नुकसानही चालवले आहे. गाझाच्या 40 वर्ग किमीच्या एका अत्यंत चिंचोळ्या पट्टीतील लाखो नागरिकांना त्या पट्टीच्या दक्षिण भागात विस्थापित होण्याचा इस्रायलने आदेश दिला, आणि नंतर मात्र दक्षिणेकडील भागावरही हल्ले चढवले. हमासने निर्माण केलेल्या भूमिगत मार्गांच्या जाळ्याला (ज्याला गाझा मेट्रो असे नाव आहे) उद्ध्वस्त करण्याकरिता त्या सुरुंगांमध्ये न शिरता हवेतून आणि जमिनीवरून बॉंबवर्षावाची रणनिती इस्रायलने अवलंबली आहे, ज्याचा सरळ अर्थ आहे प्रचंड मोठ्या प्रमाणात सामान्य लोकांची जीवितहानी. सर्वाधिक भयावह म्हणजे इस्रायलने खुलेपणाने अल-शिफासहीत अनेक हॉस्पिटल्सला निशाणा बनवत उध्वस्त केले आहे, जे आंतरराष्ट्रीय कायद्यांचे उघड उल्लंघन आहे. इस्रायल करत आहे, तो एक मानववंश संहार आहे!

मानववंश संहाराचे हे भीषण चित्र समोर असताना मात्र जगातील बहुसंख्य देश अजूनही बघ्याच्या वा थांबा आणि वाट पहाच्या भूमिकेत आहेत, वा थेट इस्रायलचे समर्थन करत आहेत. युरोपियन देशांनी व अमेरिकेने तर थेट इस्रायलच्या समर्थनात भूमिका घेतली आहे. अमेरिकेने नेहमीप्रमाणे आपल्या नकाराधिकाराचा वापर करत इस्रायलच्या हल्ल्याला थांबवायला नकार दिला आहे, इतकेच नव्हे इस्रायलला शस्त्रपुरवठा करत युद्धखोरीला उत्तेजन दिले आहे. म्हणायला सामान्य जनतेच्या जीवितहानीचे नक्राश्रू अमेरिकेने ढाळले आहेत, परंतु कारवाई मात्र पूर्णत: इस्रायलच्या बाजूने आहे. चिले, बोलिव्हिया, बहारीन, होंडूरास, तुर्की, चाड, दक्षिण आफ्रिका, बेलिझ, जॉर्डन या देशांनी इस्रायलच्या निषेधात आपले राजदूत परत बोलावले आहेत. युरोप, दक्षिण अमेरिका, आफ्रिका खंडातील शेकडो देशांमध्ये जनतेचे मोठमोठी आंदोलने इस्रायली हल्ल्याविरोधात केली आहेत. परंतु, अरब एकतेच्या नावाखाली पॅलेस्टाईनच्या स्वातंत्र्यलढ्याच्या समर्थनात भूमिका घेणारे अरब देश अजूनही इशारे देण्यापलीकडे जात नाहीयेत. अरब देशांमध्ये जनतेचा राग मात्र प्रचंड उफाळून येत आहे, ज्याचा दबाव सौदी, इराण, सिरिया, लेबनन, इजिप्त सहीत सर्व देशांमधील भांडवलदार वर्गाच्या सत्ताधाऱ्यांवर वाढत आहे, परंतु एकीकडे जनदबाव आणि दुसरीकडे जागतिक साम्राज्यवादी युत्यांचा दबाव अशामध्ये अरब भांडवलदार वर्ग अडकलेला आहे. जागतिक साम्राज्यवादी स्पर्धेत अमेरिकाप्रणित ॲंग्लो-सॅक्सन अक्षाचा विरोधक मानले जाणारा चीन-रशिया अक्ष देखील अजूनही तोंडी निषेध करण्यापलीकडे आणि ठराव पास करण्यापलीकडे गेलेला नाही. पॅलेस्टाईनच्या समर्थनात सर्वाधिक आक्रमकपणे भूमिका घेणारे लॅबनॉनचे हिजबोल्ला, आणि या दोघांचा पाठिराखा असलेल्या इराणने सुद्धा अजूनही कोणतेही निर्णायक पाऊल टाकलेले नाही. या प्रत्येक देशातील सत्ताधारी भांडवलदार वर्ग संभाव्य प्रादेशिक युद्धातून नफ्या-तोट्याची

पान 10 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय: द्वारे बबन ठोके, देविका मेडिकोच्या वर, साई कृपा चाळ, साईबाबा मंदिराजवळ, वीर जिजामाता भोसले मार्ग, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर, मानखुर्द, मुंबई - 400043 • मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित